"दया करा या अनन्यशरणा" ।।
ऐसी साईंशी भाकावी करूणा ।
अभयकर आणि अभयवचना ।
मागावें दीना दासातें ।।१०२ ।।
त्याच दिवशीं शिरडीहून ।
धाडिलें सविस्तर पत्र लिहून ।
वितळलें वडिलांचें अंत:करण ।
पत्र तें वाचून पाहतां ।।११२ ।।

- श्री साईसच्चरित, अध्याय ९.

चौथे पत्र आहे ते अध्याय १२ मधील ओव्या ४३ ते ४५ मधील. काका महाजनी, शिरडीतील गोकुळ अष्टमीचा सोहळा पाहता यावा, हा हेतू मनात धरून व एक आठवडा तेथे राहण्याचा बेत करून, शिरडीत आले; तर बाबांनी त्यांना लगेच परतण्यास सांगितले. कारण, काका शिरडीहून परत निघताच शिरडीस गेलेले पत्र परत काकांच्या घरी येऊन त्यांची तेथे वाट पहात होते.

आरंभींच बाबांच्या दर्शना ।
जातां बाबा पुसती तयांना ।
"परतणार केव्हां निजसदना" ।
विस्मित मना तैं काका ।।३७ ।।
मुनीम एकाएकीं आजारी ।
मालकास काकांची जरूरी ।
काकांनीं त्वरित यावे माघारी ।
पत्र शिरडीवरी मोकलिलें ।। ४३ ।।
काका तेथूनि निघाल्यावरी ।
टपालवाला तपास करी ।
मग तें पत्र पाठवी माघारी ।
मिळालें घरीं काकांस ।।४४ ।।

- श्री साईसच्चरित, अध्याय १२

आपल्या भक्ताला नोकरीधंद्यातही बाबा किती योग्य तऱ्हेने सांभाळत असत, हे वरील पत्रोत्तरात दिसून येते. तसेच, नोकरीत प्रामाणिकपणा व कर्तव्यदक्षता असावी, हा साईबोध येथे दिसून येतो.

यापुढील विशेष मनाला भावणारा कथाभाग म्हणजे, टपालमार्गे आलेली 'बंगी' (पार्सल). हा कथाभाग अध्याय २७ मध्ये ओव्या १३२ ते १३७ यांमधून आलेला आहे. एकदा शिरडीला बापूसाहेब जोगांच्या नावे बंगी आली, त्याचे रसाळ वर्णन मनाला आनंद देणारे आहे :-

एकदां जोगांची आली बंगी ।
शिरडी पोस्टांत टपालमार्गीं ।
स्वीकारावया तया जागीं ।
लागवेगीं निघाले ।।१३२ ।।
पुस्तक पाहती तों तें भाष्य ।
लोकमान्यांचें गीतारहस्य ।
बगलेस मारून मशिदीस ।
दर्शनास पातले ।।१३३ ।।
नमस्कारार्थ खालवितां डोई ।
बंगीही पडली बाबांचे पायीं ।
"बापूसाब ही कशाची काई" ।
बाबा ते ठायीं पूसती ।।१३४ ।।
बंगी मग समक्ष फोडली ।
कसली काय ती वार्ता कळविली ।
ग्रंथासह बाबांचे हातीं दिधली ।
अवलोकिली बाबांनीं ।।१३५ ।।
ग्रंथ काढोनि हातीं घेतला ।
क्षणार्धांत चाळून पाहिला ।
खिशांतून एक रुपया काढिला ।
वरती ठेविला कौतुकें ।।१३६ ।।

- श्री साईसच्चरित, अध्याय २७

या ठिकाणी ग्रंथाचा गौरव करून साईबाबांनी, "ग्रंथ हे गुरु असतात", हे पटवून दिले. ग्रंथांचा मान राखावा, त्यांच्याठायी आदराने पूज्यभाव ठेवून ते जतन करावेत, वेळेस उपयोगी पडतात, हा साईबोध साईबाबांनी दिला आहे.

यापुढील पत्राचा उल्लेख अध्याय ४२ मध्ये ओव्या ७२ व ७३ मध्ये आहे. साईबाबांनी जेव्हा समाधी घेतली त्यावेळी शिरडीहून बाहेरगावच्या भक्तांना भराभर पत्रे गेली व त्यांना शिरडीला बोलावून घेण्यात आले. साईबाबांचे लाडके भक्त दासगणू महाराज यांना याविषयी पत्र गेले :-

इतुक्यांत शिरडीहून पत्र जातां ।
कळली बाबांची समाधिस्थता ।
ऐकूनि गणुदास निघाले ही वार्ता ।

**क्षण न लागतां शिरडीस ।।७२ ।।**
**सर्वे घेऊनि शिष्यपरिवार ।**
**येऊनियां समाधीसमोर ।**
**मांडिला कीर्तन-भजन-गजर ।**
**अष्टौप्रहर नामाचा ।।७३ ।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ४२**

वास्तविक, संत हे मरणातीत, निर्मरण आहेत; परंतु लोककल्याणार्थ मानवी देह धारण केल्याने अवतारकार्य संपताच देहधर्मानुसार जन्माप्रमाणेच त्यांना मृत्यूला सामोरे जावयाचे असते, हे साईबाबांनी या ठिकाणी कृतीद्वारे सांगितले आहे. तसेच, संत समाधिस्थ झाले तरी, अदृश्य शक्तिरूपाने कायम भक्तांचे कल्याण साधतात, हेही समजाविले आहे.

दोन साईभक्तांमध्ये साईबाबांच्या महान सामर्थ्याविषयी पत्रव्यवहार झाल्याचा उल्लेखही श्री साईसच्चरितात आहे. विशेषतः, नानासाहेब चांदोरकर, दासगणू महाराज, दादा केळकर इत्यादींनी हा पत्रव्यवहार केला आहे.

अध्याय १३ मध्ये ओव्या ४७ ते ५७ मधून भीमाजी पाटलांचा कफक्षयाचा रोग साईबाबा समूळ नाश करतात व त्यांना शिरडीला जाण्यास पत्ररूपाने चांदोरकर सल्ला देतात; तो असा :-

**असो कळवळ्याचा धांवा ऐकिला ।**
**देव तात्काळ गहिंवरला ।**
**बुद्धि उपजली भीमाजीला ।**
**पत्र नानाला घालावें ।।४७ ।।**
**पाटील लिहिती चांदोरकरांस ।...**
**तरी आतां एक विनंति ।...**
**व्हावी मज आपुली भेट निश्चिती ।**
**ही एक चित्तीं असोसी ।।५५ ।।**
**चांदोरकरांनीं पत्र वाचिलें ।...**
**उत्तरीं कळविती एकचि उपाय ।**
**साईबाबांचे धरावे पाय ।**
**हाचि केवळ तरणोपाय ।**
**बाप माय तो एक ।।५७ ।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय १३**

दुसरा पत्रोत्तराचा उल्लेख, नांदेडचे रतनजी शेठ यांनी मौलीसाहेबांसाठी केलेल्या ३ रु. १४ आणे खर्चासंबंधाने जेव्हा साईबाबा, मौलीबुवांशी त्यांची एकरूपता रतनजींना प्रत्यक्ष भेटीत सांगतात त्यावेळी आढळतो. या कथाभागात 'तार व तारायंत्रें' या शब्दांमार्फत संतांमधील एकरूपता सांगितली आहे; ती अशी :-

**शिरडी-नांदेडीं महदंतर ।**
**त्या दोघांचें एक अंतर ।**
**एक प्राण एक शरीर ।**
**तेणें ही तार परस्परां ।।१९२ ।।**
**काय नवल हें साधुसंत ।**
**तारायंत्रें तारारहित ।**
**कुठें कांहींही घडो सृष्टींत ।**
**साद्यंत अवगत तयांतें ।।१९३ ।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय १४**

या ठिकाणी संतांची सत्ता सर्व ठिकाणी असते; मात्र त्या सत्तेचा उपयोग ते भक्तरक्षणार्थ करतात, भक्तांना त्याची प्रचिती देऊन त्यांचे भले साधतात.

तिसरा पत्रव्यवहार दादा केळकरांमार्फत झालेला आहे. गोखलेबाई या साईदर्शनाला प्रथमच शिरडीला आल्या त्यावेळी त्यांनी सोबत आणलेले काशीबाई कानीटकर यांचे पत्र दादा केळकरांकडे दिले व साईबाबांचे त्यांना दर्शन घडून त्यांच्यावर साईबाबांनी अनुग्रहं केलेला आहे. अध्याय ३२ मध्ये ओव्या १३८ ते १४८ मधून या पत्रासंबंधीचा उल्लेख आहे; तो असा :-

**कानीटकर काशीबाई ।**
**आप्तसंबंधें पत्र देई ।**
**विनवी दादांस लावाया सोई ।**
**दर्शनार्थ साईबाबांच्या ।।१३९ ।।**
**कोणाचें काय अंतर्गत ।**
**साईनाथ जाणे समस्त ।**
**ऐसें न कांहीं भूमंडळांत ।**
**नसे जें अवगत तयांस ।।१४१ ।।**
**उपनांव बाईचें गोखले ।**
**उक्त प्रकारें मनीं निर्धारिलें ।।**
**दादांच्या येथेंच गांठोडें लाविलें ।**

**पत्र दिधलें तयांस ।।१३८।।**
**चरण बाबांचे अभिवंदून ।**
**दादांचिया घरीं जाऊन ।**
**पुरणपोळीचें जेवण करून ।**
**सर्वांस वाढून जेवली ।।१४७।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ३२**

चौथा पत्रव्यवहाराचा उल्लेख ग्वाल्हेरच्या डॉक्टर कॅप्टन हाटे यांच्याविषयीचा आहे. कॅप्टन हाटे यांना वाटते, साईबाबांना वालपापडीच्या शेंगांची भाजी व इतर जेवण द्यावे. म्हणून ते मुंबईच्या मित्राला, टपालमार्गे पैसे पाठवितो; आपण शिरडीला जाऊन माझी इच्छा पूर्ण करा, असे पत्र लिहितात. हा कथाभाग अध्याय २९ मध्ये ओव्या १५१ ते १५९ मधून आलेला आहे.

**परी ते तेव्हां ग्वालेरीस ।**
**पत्र लिहिलें मुंबईस ।**
**वृत्तान्त साद्यंत कळविला स्नेह्यास ।**
**विनविलें शिरडीस जावें स्वयें ।।१५२।।**
**टपालमार्गें येईल पैसा ।**
**शिधा घ्यावा योग्य तैसा ।**
**शेंगा पापडीच्या सुंदर खाशा ।**
**मिळवाव्या कैशातरीही ।।१५३।।**
**उरला पैका स्वयें न्यावा ।**
**शिध्यासमवेत बाबांस द्यावा ।**
**चरण वंदूनि प्रसाद मागावा ।**
**तो मज द्यावा पाठवून ।।१५४।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय २९**

पाचवा पत्रव्यवहार म्हणजे, बिनतारी संदेशाने श्री वासुदेवानंद सरस्वती व साईबाबा यांची भेट व संभाषण. राजमहेंद्री शहरी श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी पुंडलिकरावांजवळ साईबाबांना देण्यासाठी नारळ आपल्या हृदयाला लावून दिला. त्यांना माझ्याकडून ही भेट द्या, म्हणून बजावले. हा संदेश साईबाबांना अगोदरच समजलेला होता. संत एकमेकांशी बिनतारी संदेशाने बोलत असत, याचा उल्लेख अध्याय ५१ मध्ये ओव्या १२५ ते १६३ मध्ये आढळतो.

**आतां आम्ही अहर्निश ।**
**पाठवितों बिनतारेचे संदेश ।**
**दिमाख याचा दावितों विशेष ।**
**अभिमान वश होऊनि ।।१६१।।**
**यदर्थ उभारूं लागतीं स्थानें ।**
**लागे अपार पैसा खर्चणें ।**
**तेथें हीं संतांस न लगतीं साधनें ।**
**पाठविती मनेंच संदेश ।।१६२।।**

**- श्री साईसच्चरित, अध्याय ५१**

वरील श्री साईसच्चरितातील साईबाबांशी साईभक्तांचा जो पत्रव्यवहार दोन प्रकारे आढळतो त्यातून आपणास कसे मार्गदर्शन होते ते आता पाहू या :-

* त्यावेळचे साईभक्त अधिक सश्रद्ध होते. त्यांच्या भक्तीत कुठेही वरवरचा देखावा दिसत नाही; उलट निखळ निस्सीम भक्तिभाव आढळतो.
* गुरुनिष्ठा तीव्र स्वरूपात जाणवते. तसेच, गुर्वाज्ञापालन करणे आपले कर्तव्य आहे, ही जाणीव त्या त्या भक्तांत दिसून येते.
* साईबाबांचा आपल्या भक्तांविषयीचा जिव्हाळा दिसून येतो. वेळप्रसंगी कानउघडणी करून भक्तांना संकटातून, तोट्यातून वाचविताना, आपल्या भक्तांचे हित साधताना ते दिसतात.
* आपल्या भक्तांच्या योगक्षेमाची काळजी साईबाबा सदैव करतात, हे पहावयास मिळते.
* भक्ताकडून साईबाबांच्या आज्ञेचे उल्लंघन सहसा होत नाही आणि तसा प्रयत्न झालाच तर कठीण प्रसंग उद्भवून भक्ताला पश्चात्ताप होतो आणि लगेच साईमाउली धाव घेते व भक्ताला वाचविते, त्याच्यावर अनुग्रह करते, हे दिसून येते.

आपण साईभक्तांनी या पत्रव्यवहारातून वरील गोष्टी आत्मसात केल्या व तेवढीच आंतरिक निष्ठा, तळमळ साईबाबांप्रति आपली असली, तर निश्चितपणे साईमाउली आपल्या सर्वांना जिव्हाळ्याने जवळ करील, अनुग्रह करील व आपल्या सर्वांच्या योगक्षेमाची जबाबदारी निश्चितच स्वीकारील.

**- साईसेविका**

❑❑❑

स्वामी नारायण जयंती (२१ एप्रिल) निमित्त

भक्तिपंथ परिचय

# स्वामी नारायणाची कथा

विक्रम संवत १८३७ ते १८८६ (इ. स. १७९० ते १८३०)

**स्वा**मी रामानंद आपल्या गादीवर बसलेले आहेत. त्यांच्यापुढे जमिनीवर – एका चटईवर तेजःपुंज युवक संन्यासी नीलकंठवर्णी बसलेला आहे.

'नीलकंठ ! आता पुढे तीर्थयात्रेसाठी कुठे जाण्याचा विचार आहे', स्वामी रामानंद विचारतात.

'स्वामी ! आता आपले पाय सोडून, आपला सहवास सोडून कुठेही जाण्यास मन करत नाही', बाल नीलकंठ अत्यंत विनयाने स्वामींपुढे हात जोडून आपले मत व्यक्त करतो.

स्वामीजी म्हणतात, 'अरे, तू बदरीकेदार, जगन्नाथपुरी, रामेश्वर या यात्रा पायी पूर्ण केल्या आहेस. आता द्वारकेचे दर्शन करावयाचे नाही काय ?'

नीलकंठ अत्यंत भावुक होऊन नतमस्तक होत म्हणतो, 'आता माझ्यासाठी तुम्हीच द्वारकाधीश - द्वारकाधाम आहात. तुम्हीच माझे केदार, बदरी आणि जगन्नाथ आहात. तुम्ही भेटला नव्हंतात तेव्हा यात्रा केल्या; आता तुमची भेट झाल्यानंतर यात्रांची गरजच मला वाटत नाही. आता तुमचे चरण हेच माझे अढळ आश्रयस्थान आहे.'

नीलकंठवर्णीची ही भक्ती, निष्ठा पाहून स्वामी रामानंद संतुष्ट झाले आणि आपणास पाहिजे तसा उत्तराधिकारी प्राप्त झाल्याबद्दल त्यांनी मनोमन देवाचे आभार मानले. स्वामी रामानंद यांनी मुक्तानंदजी आदि शिष्यांना बोलाविले आणि आपला संतोष प्रगट केला.

विक्रम संवत १८५७ (इ. स. १८१०), कार्तिक शुक्ल एकादशीच्या शुभमुहूर्तावर स्वामी रामानंद यांनी ब्रह्मचारी नीलकंठवर्णी यास शिष्यत्वाची दीक्षा दिली व त्यांचे दीक्षोत्तर नाव **सहजानंदस्वामी** तथा **'नारायणमुनी'** ठेवले. हेच सहजानंदस्वामी स्वामी नारायण पंथाचे प्रवर्तक होय.

**मुंबईला दादर रेल्वे-स्टेशनच्या बाहेर पूर्वेला एक सुंदर मंदिर सर्वांच्या नजरेस पडते. 'स्वामी नारायण' मंदिर म्हणून बहुतेकजण या मंदिरास ओळखतात. 'स्वामी नारायण' हा एक पंथ आहे. गुजरातमध्ये या पंथाचे फार मोठे कार्य व मोठमोठी मंदिरे आहेत. अहमदाबादचे 'अक्षरधाम' मंदिर सर्वांनीच आवर्जून पाहण्यासारखे प्रेक्षणीय व अनुभवण्यासारखे प्रसन्न आहे. या स्वामी नारायण भक्तिपरंपरेचे प्रवर्तक स्वामी सहजानंद यांच्या विलक्षण जीवनाची दिव्य कथा –**

## जन्म व बालपण

स्वामी सहजानंद यांचा जन्म प्रभू रामचंद्रांची जन्मभूमी अयोध्येच्या जवळील 'छपैया' या गावी झाला. विलक्षण योग म्हणजे, चैत्र शुद्ध नवमी - रामनवमीच्या परम पावन दिनी झाला. रामनवमीच्या दिनी जन्म झाल्याने ईश्वरानेच पुन्हा अवतार घेतला, अशी सर्वांची श्रद्धा झाली. त्याचे नाव घनश्याम ठेवले गेले. पिता धर्मदेव आणि माता भक्तिदेवी यांच्या घराचे घनश्यामच्या बाललीलांनी गोकुळ झाले. पिता धर्मदेव संस्कृतचे विद्वान पंडित होते. त्यांची विद्वत्ता काशीक्षेत्री गणमान्य होती. त्यांनी छोट्या घनश्यामला संस्कृत-पाठाची संथा दिली. खरं तर पित्याचे शिकवणे हे नाममात्र होते. छोटा घनश्याम उपजत ज्ञानी होता. तो विद्येसह जन्माला आलेला होता.

वडिलांकडून पहाटे संस्कृत शिकणे, प्रभातसमयी शरयूमध्ये स्नान करून किनाऱ्यावर ध्यानधारणा करणे, अयोध्येतील विविध मंदिरांमध्ये आरतीला जाणे, रामायण कथा, महाभारत कथा ऐकणे ही छोट्या घनश्यामची आवड होती. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' तद्वतच घनश्यामच्या प्रत्येक गोष्टीतून त्याचे वेगळेपण व अलौकिकत्व दिसून येत होते. हनुमान गढी हे त्याचे आवडते स्थान होते. धर्मदेवजींनी घनश्याम ८ वर्षांचा होताच त्याचा विद्याव्रत (उपनयन) संस्कार केला.

हिमालयाची विलक्षण ओढ छोट्या घनश्यामला होती.

हिमालयात जावे, साधुसंत-मुनीजनांची सेवा करावी, संतसंग करावा, ध्यानधारणा, तपाचरण करावे, अशी त्याच्या मनात वारंवार उर्मी उठे. आईवडिलांचे छत्र हरपले. मोठा भाऊ प्रतापवर आपला भार पडू नये. आता आपण आपल्या इच्छेनुसार कार्यरत व्हावे, असा निश्चय करून एके रात्री घनश्यामने गृहत्याग केला आणि हिमालयाची तपोभूमी गाठली. हिमालयात गेल्यावर त्याने आपले नावही त्यागले. आणि 'नीलकंठ' नावाने ते साधुसंन्याशांमध्ये विहरू लागले. अनेक साधुसंतांच्या सानिध्यात त्यांनी तपाचरण केले. 'नीलकंठवर्णी' नावाने ते साधुसंतांमध्ये सर्वांचे प्रिय झाले. तपाचरण पूर्ण होताच त्यांनी भारतभ्रमण करण्याचे ठरवले आणि बदरीकेदार करून जगन्नाथपुरी, रामेश्वर या यात्रा केल्या. रामेश्वरयात्रा संपवून पश्चिम किनाऱ्यावरील द्वारकाधाम यात्रेसाठी नीलकंठवर्णी निघाले आणि वाटेत गुजरातमधील जुनागढ येथे आले. जवळच 'लोजपूर' येथे स्वामी रामानंद यांचा आश्रम आहे, हे ऐकून नीलकंठवर्णी स्वामी रामानंद यांच्या दर्शनासाठी आश्रमात गेले. आश्रमात रामानंदशिष्य मुक्तानंदस्वामी यांच्याशी त्यांचा भक्तिलोभ जमला.

स्वामी रामानंद कच्छमध्ये होते. नीलकंठवर्णींचे स्वामी मुक्तानंद यांच्या पत्रात लिहिलेले वर्णन वाचून त्यांनी त्वरित आश्रमात (लोजपूर) येण्याचे ठरविले. स्वामी रामानंद व नीलकंठवर्णी यांच्या पहिल्या भेटीतच दोघांना एकमेकांच्या अंतरंग-अधिकाराची ओळख पटते. रामानंदस्वामी दर्शनास आलेल्या नीलकंठवर्णींस मिठी मारून भेटतात व ज्याची आजवर वाट पहात होतो तो भेटला, असा संतोष त्यांच्या चेहऱ्यावर प्रगट होतो.

नीलकंठवर्णींस शिष्यत्व दिल्यानंतर इतर सर्व जुन्या शिष्यांसमवेत चर्चा करून सर्वानुमते रामानंदस्वामी नीलकंठवर्णी ऊर्फ सहजानंदस्वामी ऊर्फ स्वामी नारायण यांस आपला उत्तराधिकारी नियुक्त करतात. विक्रम संवत १८५८ (इ. स. १८१०), कार्तिक शुक्ल एकादशीच्या मंगल दिनी जेतपूर (गुजराथ) येथे स्वामी सहजानंद यांचा उत्तराधिकारी म्हणून पाटोत्सव होतो. यानंतर केवळ एक महिन्याने स्वामी रामानंद आपले इहलोकीचे कार्य पूर्ण झाल्याच्या कृतार्थतेने मार्गशीर्ष शुक्ल त्रयोदशी दिनी फणेणी येथे समाधिस्थ होतात. 'मी कार्याचा श्रीगणेशा केला, पण खरे मंदिर उभे करणार आहे, खरे कार्य विस्तारणार आहे तो स्वामी सहजानंदच ! मी चौकटीवरचा गणेश आहे, तो गर्भगृहातील मुख्य देवता आहे, हे विसरू नका,' स्वामी रामानंदांचा हा सर्व शिष्यांना अखेरचा उपदेश खूप काही सांगणारा व स्वामी सहजानंद ऊर्फ स्वामी नारायण यांची महती अधोरेखित करणारा आहे. विक्रम संवत १८८६ मध्ये वयाच्या ४९ व्या वर्षी स्वामी नारायण यांनी आपली इहलोक यात्रा संपविली.

स्वामी सहजानंदांनी गुरु रामानंदाच्या इच्छेनुसार खूप मोठे कार्य केले. मंदिरांची निर्मिती केली. पुरुषोत्तम भगवान उपासनेच्या या परंपरेस पुढे लोक **'स्वामी नारायण परंपरा'** या नावाने ओळखू लागले. या परंपरेने उपासना - भक्तिप्रचाराबरोबरच सामाजिक कार्यातही खूप मोठे योगदान केलेले आहे. मुंबईत शीव भागात प्रमुख स्वामींच्या नावे असलेले नेत्ररुग्णालय - नेत्रपेढी सर्वपरिचित आहे.

❑❑❑



**कथा उपदेश**

## स्वामी रामकृष्ण परमहंस

**स्वा**मी रामकृष्ण परमहंस यांना बेलूर मठामध्ये अनेक लोक भेटण्यास येत असत व मनमोकळेपणाने आपले मनोगत व्यक्त करून उपदेशामृताने संतुष्ट होत असत.

असाच एके दिवशी एक माणूस त्यांना भेटला व म्हणाला -

'स्वामीजी, आपण म्हणता की, देव सर्वांचा आहे. तो सर्वांना भेटतो. मी तर पापाची खाण आहे. सत्य-पुण्य या गोष्टींचा माझ्या मनाला कधी स्पर्शसुद्धा झालेला नाही. माझ्यासारख्या पापी माणसाला देव भेटेल का ?'

'जरूर भेटेल ! का नाही भेटणार !! देव भेटावा अशी तुझी तळमळ खरी असेल, तर देव निश्चित भेटेल', स्वामीजींनी त्याला विश्वासपूर्ण उत्तर दिले.

'पण, स्वामी, मी पापी आहे. अज्ञानी आहे. मला ना पूजापाठ येतो, ना भजन-कीर्तन येते. देवाला प्रेमाने कसे आळवितात, बोलवितात, ते मला काहीच माहीत नाही. मग, केवळ इच्छा म्हणून देव भेटेल का ?'

मातृभावाने स्वामीजी जरा रागावले आणि म्हणाले -

'जन्मलेल्या मुलाला आईला कसे बोलवावे, हे कोणी शिकवते का ? त्याचे आर्त रडणेच आईला धावून येण्यास पुरेसे असते. देवासाठी आर्त भावाची हाक दे, बाकी अवडंबर पाहिजे कशाला ?'

**(स्वामी रामकृष्ण जयंती, १६ मार्च निमित्त पुण्यस्मरण)**

संत-स्मरण

संतकवि दासगणूविरचित कीर्तन-आख्यानाच्या आधारे

# संत नरहरि सोनार (पुण्यतिथी, दि. १ मार्च)

भीमरथीचे काठी पंढरी वैकुंठ होय साचार।
तेथे नरहरि नामे गेला होऊन भक्त सोनार ।।१ ।।
असे बेलाचे झाड सदनद्वारी।
कंठि घाली रुद्राक्षं भस्मधारी।
सदा 'हरहर' हे वदे तदिया वाचा।
पडू न दे वारा इतर देवतेचा ।।२ ।।

एक भिक्षुक -

आज हरिदिनी
एकादशीव्रत।
खाशी आनंदात तांबूल तूं ।।
पंढरीचा मूढा असूनि
निवासी।
द्वेष विठ्ठलसी कां रे तुझा ।।

संत नरहरि -

ही नसे क्षेत्र पंढरि। असे
शिवपुरी।
भिमेच्या तिरी। म्हणून मी
वसतो ।।
हंसा न रुचे सहवास थिल्लराचा तो ।।
येथील देव पशुपति, दक्षिणामूर्ति जयाला म्हणति
मल्लिकार्जुन जो पंचवदन परमेश पार्वती रमण ।।

संतकवि दासगणू प्रतिष्ठान, गोरटे यांनी 'साईलीला'च्या संदर्भ ग्रंथालयासाठी दासगणूंची समग्र ग्रंथसंपदा सप्रेम भेट दिलेली आहे. त्या ग्रंथसंपदेतील 'माणिक-मोती' या अंकापासून 'संत-स्मरण' या नावाने संकलनरूपात प्रकाशित होणार आहेत. या अंकात संत नरहरि सोनार यांचे पुण्यस्मरण.

(शिवभक्त नरहरि व वैष्णवभक्त भिक्षुक यांचा हा वाद संतकवि दासगणूंच्या कीर्तन-आख्यानात मूळातूनच वाचण्यासारखा आहे. हा वाद ऐकून पंढरीनाथ माता रुक्मिणीस म्हणतात -

शैव वैष्णव यांचे करण्या ऐक्य।
पंढरी क्षेत्र निर्मिले देख।
परी नरहरि बालक।
ये न रुक्मिणीमंदिरा ।।१२ ।।

आता रुक्मिणी म्हणते -

सोनार तो मुळिच पारख त्या जगाची।
कांपे तया पुढति धातुहि कांचनाची।
प्रत्यक्ष द्याल अनुभव तयास जेव्हा।
वंदील तो समपदांप्रति साच तेव्हा ।।१४ ।।

पुढे एके दिनी एक गुजराथी सावकार पांडुरंगास सोन्याचा करगोटा अर्पण करण्यास श्रीक्षेत्र पंढरपुरी येतो आणि उत्तम सोनार कोण आहे, चौकशी करून नरहरि सोनाराकडे येतो. तेव्हा नरहरि सोनार सावकारास म्हणतो -

न ये मी बघ मंदिरी
मदिय प्राण गेला तरी।
शिवावीण न पाहणे
मजसि वस्तु ती दुसरी ।।

एक शिवशंकराशिवाय मी कोणाही देवाचे तोंड बघत नाही, त्यामुळे पांडुरंगाच्या कमरेचे माप घेऊन तो दागिना करणे मला शक्य नाही, असे नरहरि म्हणतो. पण, अखेर बायकोच्या आग्रहामुळे, घरच्या आर्थिक चणचणीमुळे तो करगोटा करण्याचे काम स्वीकारतो. करगोटा उत्तम-देखणा होतो. पण, पांडुरंगाच्या कमरेला तो सैल होतो. कितीदा तरी नरहरि तो दुरुस्त करून देतो. पण, देवाचीच लीला, करगोटा प्रत्येक वेळी २ बोटे सैलच होतो. अखेर नरहरिला पांडुरंगाच्या मंदिरात, आपला पूर्वीचा दुराग्रह सोडून, येणे भाग पडते. पण, तो देवळात कसा जातो ?

झाला निरूपाय अखेरी।
डोळे बांधून नरहरी।
श्री विठ्ठलाच्या मंदिरी।
डाग बसविण्या निघाला ।।

करगोटा बसवू जाता।
विठू लिंगाकारचि झाला।
दशभूज पंचवदनाचा।
विटेवरी होऊनि ठेला।
वामांकि असे पार्वती।
तसा गणपति। मस्तकावरति।
वाहते गंगा। गणु बोले जय शिव-लिंगा॥

ही विठ्ठललीला बघून नरहरि म्हणतो -

पुरे रे पुरे खेळ हा नाटक्या रे
हराचे नको सोंग घेऊ वृथा रे॥

आणि नरहरी पुन्हा पाहतो तो -

नरहरि बघता परतोनिया।
नरहरि शिवसा दिसला तया।
हरिहरात्मक ते रूप गोजिरे।
नरहरि करि वंदन आदरे॥

अशा प्रकारे विठ्ठलमूर्तीतच नरहरिस शिवाचे दर्शन होते व हरिहराच्या ऐक्याचा बोध होतो. ईश्वर एक आहे, हे तत्त्व मनोमन पटते.

धन्य धन्य हे लोचन।
झाले आद्याचे दर्शन।
वंद्य सेव्य सकलां मतां।
तूच एक पंढरीनाथा।
शिव विष्णु एकरूप।
तो हा विठू माय-बाप।
गणु म्हणे द्वैत गेले।
तत्त्व हातासी लागले॥

**तात्पर्य बोध : 'सबका मालिक एक'**, ही साईबाबांची शिकवण साईबाबांचे थोर भक्त संतकविं दासगणू यांनी नरहरि सोनाराच्या कीर्तन-आख्यानातून प्रतिपादन केलेली आहे.

❑❑❑


# निवेदन

'साईलीला' द्वैमासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशिलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशनाचे स्थळ | : | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| २. | प्रकाशनाचा कालावधी | : | द्वैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | द. म. सुकथनकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ४. | प्रकाशकाचे नाव | : | द. म. सुकथनकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ५. | संपादकाचे नाव | : | द. म. सुकथनकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. |
| ६. | हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते | : | श्री साईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, द. म. सुकथनकर यानुसार असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**द. म. सुकथनकर**

(प्रकाशकाची सही)
अध्यक्ष,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## संत तुकारामांची अभंगवाणी

जेणे माझे चित्त राहे तुझ्या पायी।
अखंड ते देईं प्रेमसुख ॥१॥
देहभाव राखा दीन करूनिया।
जनाचारी वाया जाय तैसा ॥२॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी।
कवणेविशी गोडी प्रपंचाची ॥३॥
तुझे नाम माझे धरूनिया चित्त।
एकांत लोकात सदा राहो ॥४॥
तुका म्हणे तुझे जडोनिया पायी।
झालो उतराई पांडुरंगा ॥५॥

(तुकाराम बीजेनिमित्त,
संत तुकारामांच्या पुण्यस्मरणासह)

## संत एकनाथांची अमृतवाणी

सोहं सोहं वाजे ढोल।
आमुचा युगायुगीचा खेळ।
परब्रह्म भुलले अकळ।
या खेळाचे गुरु जाणे मूळ ॥१॥
ब्रह्मा विष्णू शिवादी साचार।
आधी होते निराकार।
माझे कोल्हाटियाचा प्रकार ॥२॥
खेळे परात्पर ऊपरी।
चैतन्याचे महाशिखरी।
वेळु रोविला श्रीसोहंपुरी।
खेळ खेळले नानापरी ॥३॥
आमुचा खेळ पाहून।
निर्गुण ते जाहले सगुण।
शरण एका जनार्दन।
गेला तनु मन विसरून ॥४॥

(नाथषष्ठीनिमित्त,
संत एकनाथांच्या पुण्यस्मरणासह)



## अभिप्राय

### औचित्यपूर्ण अंक

**मा**गील सर्व अंकांसह नववर्षातील जानेवारी-फेब्रुवारी, २००२ चा अंक मिळाला. या सर्व अंकांची मुखपृष्ठे पाहून साईबाबांच्या चरणी पूर्ण नतमस्तक झालो.

दिवसेंदिवस आपण औचित्य साधून 'साईलीला'ची शोभा वाढवीत आहात, त्याबद्दल धन्यवाद !

दसरा-दिवाळीच्या जोड अंकावरील आपट्याच्या पानातील साईंची प्रतिमा, नोव्हेंबर-डिसेंबरच्या अंकावरील नीमवृक्षातळी साईरूपात दत्त अवतरल्याचे दृश्य आणि जानेवारी-फेब्रुवारीच्या साई-गणेश अंकावरील ॐ साई चित्र हे अंक लक्षवेधी असून अभ्यासनीय आहेत. विशेषतः, 'पोप जॉन पॉल यांचा संदेश' हा फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांचा लेख मनाला खरोखरच चटका लावून गेला. डॉ. सौ. सुनंदा खेरडे यांचा 'जाको राखे साईयाँ' हा लेख, 'मानवधर्माच्या प्रसाराची गरज' हा श्री. प्रतापराव निंबाळकर यांचा लेख आणि 'मी देवासाठी' हा डॉ. उर्मिला तेली यांचा लेख हे लेख विशेष आवडले.

आम्ही सर्व कुटुंबिय साईंचे निस्सीम भक्त आहोत. साईलीलेचा अंक कधी हाती पडतो याची आम्ही वाटच पहात असतो. रोज संध्याकाळी एकत्र बसून ''प्रतिदिन एकतरी ओवी अनुभवावी'' याप्रमाणे आलेल्या अंकातील एका लेखाचे वाचन केले जाते. त्यातील विचारांचे चिंतन आणि मनन केले जाते आणि त्या विचारांतील अमृतकण आमच्या कौटुंबिक जीवनात उतरविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो.

साईलीलेच्या कृपेने आमच्या जीवनाची आध्यात्मिक बैठक तयार होत आहे, हे कळविण्यास सार्थ अभिमान वाटतो.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये शिरडीला सहकुटुंब आलो होतो. नवीन बदल खूप आवडला. फक्त एक गोष्ट खटकली, ती ही की, स्वच्छतागृहात गेल्यावर पैसे मागितले जातात.

साईबाबांच्या समाधीसह असलेली दिनदर्शिका फार आवडली.

साईलीलेतून असेच माहितीपूर्ण लेख प्रकाशित करावेत.

आमची वाचनसेवा आम्ही साईबाबांच्या चरणी अर्पण करतो.

**- जे. एस्. तिवाटणे**
उच्चश्रेणी मुख्याध्यापक,
जि. प. पू. प्रा. मराठी शाळा धामापूर नं. १,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

❑❑❑

**'सा**ईलीला'चा जानेवारी-फेब्रुवारी, २००२ चा अंक मिळाला. अंक वाचला. अंक वाचनीय, अंतर्मुख करणारा व संग्रही ठेवावा असा आहे. मुखपृष्ठ इतके बोलके आहे की, ते अंतरंग दाखवून देते. आतील लेख माहितीपूर्ण व ज्ञान देणारे आहेत. ज्यांच्या जीवनाला आध्यात्मिक बैठक आहे अशा लेखक-कवींना यात साहित्य देण्याची इच्छा होते. खरोखर ते भाग्यवान आहेत. धन्यवाद. श्री. सुकथनकर यांच्या कुशल मार्गदर्शनाने 'साईलीला'ची पाने फुलत आहेत. श्री साईबाबांच्या चरणी शिरसाष्टांग नमस्कार करून साईलीलेला हार्दिक शुभेच्छा प्रार्थितो.

**ज्याला सहवास साईबाबांचा**
**त्याचा संसार समाधानाचा**


**- वि. वि. देवगावकर**
वारजे, पुणे.

❑❑❑


**जा**ने.-फेब्रु., २००२ चा 'साईलीला' अंक मिळाला. तो वाचून राहवलेच नाही म्हणून त्वरेने हे पत्र लिहिले. कार्यकारी संपादक श्री. विद्याधर ताठे यांनी प्रथमच (सुरुवातीलाच) गणनायकाला वंदन करून मन 'साईगणेशाय नमः' करून टाकले. नव्या वर्षात जगात सुरू असलेल्या दहशतवादाविषयी तमाम मानवजातीमध्ये केवळ माणुसकी हाच धर्म अशी भावना वृद्धिंगत होण्यास मदत होते, ती त्यांच्या या विषयावरील लेखामुळे. साईवंदनेत साईभक्तांच्या लेखनकलेला नेहमीच प्रेरणा मिळत असते. श्री. प्र. का. सोमण यांच्या साई-उवाच बरोबरच, साईभक्त श्री. जोशी, श्री. गद्रे, श्री. रुकारी यांचे लेख आपल्याला लाभलेल्या संतकृपेची साक्ष पटवून देतात. सर्वात विशेष म्हणजे, साईभगिनी साईली यांनी शिरडी भावयात्रेने मनात भावलहरी निर्माण करून काही आठवणी ताज्या केल्या. साईंच्या कृपेने मला बऱ्याच वेळा शिरडी – दर्शनाचा लाभ झाला आहे. परंतु, का कुणास ठाऊक, ही शिरडी पावन शिरडी प्रत्येक वेळी मला नित्य नवी वाटते. जेव्हा जातो तेव्हा शिरडीत काहीतरी स्तुत्य बदल आढळतो. संस्थानच्या विश्वस्त मंडळाने केलेला सुंदर बदल केवळ अवर्णनीय असाच आहे.

**- सागर तरे**
उल्हासनगर (ठाणे).

❑❑❑

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
नवीन प्रकाशन
वाचताना शिरडीत असल्याचा भास
निर्माण करणारी व
क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी
**श्री साईंच्या प्रत्यक्ष सान्निध्यातील**
दादासाहेब खापर्डे यांची
**शिरडी रोजनिशी**



पृष्ठे : १५२

मूल्य : रु. १५ केवळ

## ॐकार व आरती साधना आणि तत्त्वबोधाचे दुसरे शिबीर
## उत्तम प्रतिसादाने यशस्वीरीत्या संपन्न

श्री साईबाबा संस्थान, शिरडी आणि श्री साई ज्ञानपीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी, २००२ या कालावधीत शिरडी येथे आयोजित करण्यात आलेल्या ॐकार साधना व आरती साधना आणि तत्त्वबोधाच्या दुसऱ्या निवासी प्रशिक्षण शिबिरास भक्त-भाविकांचा उत्तम प्रतिसाद मिळून ते यशस्वीरीत्या संपन्न झाले. शिबिरातील एकूण ८० शिबिरार्थींपैकी मुंबईकडील ४७ शिबिरार्थींनी, तर बडोदा, नागपूर, भिलई, कोल्हापूर, मिरज, जळगांव, फलटण, पुणे, रत्नागिरी, दावणगिरी या विविध भागांतील ३३ शिबिरार्थींनी शिबिरात भाग घेतला होता. विशेष म्हणजे, एकूण शिबिरार्थींपैकी ३१ शिबिरार्थी महिला होत्या. पहिल्या शिबिरातील ३३ शिबिरार्थी यावेळच्या शिबिरात उपस्थित होते. यावरूनच या शिबिराविषयी भक्त-भाविकांच्या मनात जिज्ञासा असल्याचे दिसून येते.

शिबिराचे प्रशिक्षक श्री. शरदचंद्र बाळ यांनी शिबिरार्थींना ॐकार व आरती साधनेचे प्रशिक्षण देऊन व तत्त्वबोधाचे सोप्या भाषेत विवेचन करून धर्मातीत मानवकल्याणाची शिकवण समजावून दिली आणि अध्यात्म, भक्ती व संगीत यांचा सुरेख संगम घडवून आणला.

शिबिराच्या समारोपाच्या दिवशी प्रशिक्षित शिबिरार्थींनी समाधी मंदिरात ॐकार व आरती साधनसेवा रूजू केली तेव्हा मंदिरात उपस्थित असलेले भक्त-भाविकही त्यात सहभागी झाले आणि या उपक्रमाविषयी अधिक जाणून घेण्याची उत्सुकता त्यांनी दर्शविली.

असे शिबीर वेळोवेळी होत रहावे, अशी प्रतिक्रिया शिबिराचा अनुभव घेतलेल्या सर्वांनी व्यक्त केली.

हे शिबीर यशस्वीरीत्या संपन्न होण्यात संस्थानच्या विश्वस्त मंडळातील सदस्य श्री. मिराणे आणि संस्थान अधिकारी सर्वश्री सुभाष जगताप, प्रकाश खोत व शशिकांत कुळकर्णी यांचे सक्रिय सहकार्य मोलाचे ठरले.

### श्री साईबाबा संस्थान, शिरडी व श्री साई ज्ञानपीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने
## शिरडी येथे ॐकार साधना कार्यशाळा

श्री साईबाबा संस्थान, शिरडी व श्री साई ज्ञानपीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ॐकार साधनेची कार्यशाळा शनिवार, दिनांक २२ जून व रविवार, दिनांक २३ जून, २००२ या कालावधीत शिरडी येथे समाधी मंदिरासमोरील 'सत्यनारायण हॉल'च्या वरच्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

ॐकार साधनेत अनुक्रमाने येणाऱ्या सर्व घटकांचा संथा पध्दतीने करावयाचा उच्चार, स्वर लावणे इत्यादी क्रियांचे सामूहिक स्तरावर सखोल प्रशिक्षण व सविस्तर मार्गदर्शन या कार्यशाळेत केले जाणार असून अध्यात्म, भक्ती आणि संगीत यांचा अनुपम त्रिवेणी संगम साधला जाणार आहे.

ॐकार साधनेचा प्रमुख घटक असलेल्या "ॐ श्री साईनाथाय नमः" या नामःस्मरणाच्या, श्री साई ज्ञानपीठाच्या साधकांनी स्वर-ताल-लयीत उच्चारलेल्या, ध्वनिफितीचे समाधी मंदिरात दैनंदिन प्रक्षेपण केले जात आहे.

**कार्यशाळेतील कार्यक्रम**

* शनिवार, दिनांक २२ जून, सकाळी ८ ते ९.३० व १० ते १२ - ॐकार साधना प्रशिक्षण
सायंकाळी ४ ते ६ व ७ ते ८ - ॐकार साधना प्रशिक्षण व आरती साधना

* रविवार, दिनांक २३ जून, सकाळी ८ ते ९.३० व १० ते १२ - ॐकार साधना प्रशिक्षण
सायंकाळी ४.१५ ते ५.३० - समाधी मंदिरात ॐकार व आरती साधना रुजू करण्यात येईल.

साधकांनी निवास, भोजन इत्यादी व्यवस्था स्वखर्चाने करावयाची आहे. संस्थानतर्फे अग्रक्रमाने साधकांच्या निवासाची व्यवस्था, शुक्रवार, दिनांक २१ जून रोजी रात्री ८ पासून ते रविवार, दिनांक २३ जून, २००२ रोजी रात्री ८ पर्यंत साधकांना विहित निवासखर्च आकारून केली जाणार असून नोंदणी व निवास शुल्क शिरडी बस-स्थानकासमोरील संस्थानच्या कार्यालयात स्वीकारण्यात येणार आहे. दोन दिवसांच्या या कार्यशाळेसाठी प्रत्येकी रु. १००/- प्रवेश मूल्य म्हणून कार्यशाळेचे संचालन करणाऱ्या श्री साई ज्ञानपीठाकडून आकारण्यात येणार आहे. साधकांनी शनिवार, दिनांक २२ जून, २००२ रोजी सकाळी ८ वाजता कार्यशाळेत, म्हणजे 'सत्यनारायण हॉल'च्या वरच्या मजल्यावरील सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री साई ज्ञानपीठातर्फे वरील विषयासंबंधीची कार्यशाळा (प्रवेश निःशुल्क) मुंबईत विलेपार्ले (पूर्व) येथील पार्लेश्वर मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात प्रत्येक शनिवारी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत घेतली जाते; त्या वेळेत किंवा मुंबईतील दूरध्वनी क्र. ६१७०४६२, ८३७२४३७, ६२४१२६८, ६२५३४२१ अथवा saidnyanpeeth@rediffmail.com या ई-मेलवर इच्छुकांनी संपर्क साधल्यास कार्यशाळेविषयीची अधिक माहिती मिळू शकेल.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची सूची

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | मूल्य + टपाल खर्च |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित पोथी | मराठी | ७०.०० + टपाल खर्च |
| २. | श्री साई सच्चरित | इंग्रजी | २२.०० + टपाल खर्च |
| ३. | श्री साई सच्चरित | हिंदी | २४.०० + टपाल खर्च |
| ४. | श्री साई सच्चरित | गुजराथी | ३०.५० + टपाल खर्च |
| ५. | श्री साई सच्चरित | कन्नड | २४.५० + टपाल खर्च |
| ६. | श्री साई सच्चरित | तेलुगु | २५.०० + टपाल खर्च |
| ७. | श्री साई सच्चरित | तामीळ | ३०.५० + टपाल खर्च |
| ८. | श्री साई सच्चरित | सिंधी | ५०.०० + टपाल खर्च |
| ९. | श्री साई सच्चरित पोथी | गुजराथी | ७२.०० + टपाल खर्च |
| १०. | श्री साई सच्चरित पोथी | कन्नड | ८८.०० + टपाल खर्च |
| ११. | श्री साईलीलामृत | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| १२. | श्री साईलीलामृत | हिंदी | १५.५० + टपाल खर्च |
| १३. | श्री साईलीलामृत | गुजराथी | - |
| १४. | अवतार व कार्य | मराठी | ०७.५० + टपाल खर्च |
| १५. | स्तवन मंजिरी | मराठी | ०१.२५ + टपाल खर्च |
| १६. | स्तवन मंजिरी | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| १७. | स्तवन मंजिरी | गुजराथी | ०२.५० + टपाल खर्च |
| १८. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | ०२.०० + टपाल खर्च |
| १९. | सगुणोपासना (आरती) | मराठी | - |
| २०. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| २१. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०२.०० + टपाल खर्च |
| २२. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ०४.६० + टपाल खर्च |
| २३. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | ०१.२५ + टपाल खर्च |
| २४. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ०३.०० + टपाल खर्च |
| २५. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ०८.०० + टपाल खर्च |
| २६. | मुलांचे साईबाबा | मराठी | ०२.०० + टपाल खर्च |
| २७. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | ०३.५० + टपाल खर्च |
| २८. | मुलांचे साईबाबा | हिंदी | ०२.०० + टपाल खर्च |
| २९. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | - |
| ३०. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - |
| ३१. | रुद्राध्याय (अ. ११वा) | मराठी | ०१.२५ + टपाल खर्च |
| ३२. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | १२.०० + टपाल खर्च |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - |
| ३४. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | - |
| ३५. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - |
| ३६. | खापर्डे डायरी | इंग्रजी | १२.२५ + टपाल खर्च |
| ३७. | दादासाहेब खापर्डे यांची शिरडी रोजनिशी | मराठी | १५.०० + टपाल खर्च |
| ३८. | विष्णुसहस्रनामावली | मराठी | ०२.५० + टपाल खर्च |

सूचना : **कृपया सुधारित मूल्य व टपाल खर्चासाठी लिहावे.**

# साईभक्तांना आवाहन



**प्रिय साईभक्तांनो !**

सप्रेम नमस्कार,

आपण '**साईलीला**'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. '**साईलीला**'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. तशी पत्रे आम्हाला येत आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी '**साईलीला**' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवी. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार '**साईलीला**'स मिळवून द्यायचे. त्यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी, खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. **श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !**

आपला स्नेहांकित,

**विद्याधर ताठे**

कार्यकारी संपादक, '**साईलीला**'

---

कार्यकारी संपादक,

**'साईलीला'**,

८०४-बी, साईनिकेतन,

डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),

मुंबई- ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी वार्षिक वर्गणी ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________________


पत्ता : ______________________________

______________________________

(ता. क. : सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)



मारुती मंदिर, शिरडी




ाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक

मे – जुन, २००२ रु. ८/-

# साईलीला


ादकं : द. म. सुकथनकर

कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे





# श्री रामनवमी उत्सव २००२



श्री रामनवमींच्या शुभ प्रसंगी श्री साईबाबा मंदिर परिसरात करण्यात आलेली विद्युत रोषणाई




परंपरेनुसार श्री साईसच्चरित ग्रंथ, श्री साईबाबांची तस्वीर व वीणा यांची मिरवणूक



समाधी मंदिरात श्री साईबाबांची पाद्यपूजा



गुरुस्थानात रूद्रपूजा

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

स्थापना वर्ष १९२३
# साईलीला

वर्ष ३ अंक २

**मे-जून**
**२००२**

इंटरनेट आवृत्ती
URL:http://www.shrisaibabasansthan.org

संपादक
**द. म. सुकथनकर**
कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

✻ कार्यालय ✻
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६६५५६, ४१६१२९३
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८
ई-मेल : saidadar@bom3.vsnl.net.in


संगणकीय अक्षरजुळणी
**संगणकीय विभाग, मुंबई**
**श्री साईबाबा संस्थान, शिरडी**

मुद्रण
**चिराग प्रिंटर्स, मुंबई**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी
रु. १०००/- (टपालखर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



## अंतरंग


✻ **संपादकीय** : विद्याधर ताठे ३
✻ **श्री साईंच्या व्यक्तित्वाचे दर्शन** : विजय साने ५
✻ **साई-जीवन-बोधामृत** ६
✻ **साई वंदना** २३
✻ **॥ साई उवाच ॥** : संग्राहक - कै. प्र. का. सोमण २४
✻ **संस्थानच्या स्नेहसंमेलनाचा वस्तुनिष्ठ वृत्तांत** २६
✻ **"सायलेन्स खटला चालू हाय !" एकांकिका सादर करण्यामागचा संस्थानचा उद्देश** २७
✻ **निराधार तक्रारींबाबत सादर केलेल्या निवेदनांच्या पडताळणीसाठी संस्थानचे निवेदन** ३१
✻ **साई अनुभव** ४२
✻ **रामनवमीचा अनुपम भक्तिसोहळा** : विद्याधर ताठे ४५
✻ **पदयात्रींकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** ४७
✻ **साक्षीभूत दस्तावेज** ४८



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी


## विश्वस्त मंडळ


**श्री. द. म. सुकथनकर**
(अध्यक्ष)


श्री. मोहन मो. जयकर (सदस्य)
श्री. रमेश दा. सोनी ,,
श्री. प्रकाश प्र. वैशंपायन ,,
श्री. भास्कर शं. बोरावके ,,
श्री. राजीव पुं. रोहोम ,,
श्री. शामसुंदर ल. शहाणे ,,
श्री. चांगदेव ना. डुबे पाटील ,,
डॉ. अजेय चं. गर्जे ,,
श्री. कैलास गो. कोते पाटील ,,
श्री. देवराम बं. पवार ,,

श्री. शांताराम रं. मिराणे (सदस्य)
श्री. प्रदीप र. पटेल ,,
श्री. प्रकाश द. वागस्कर ,,
श्री. दास ह. इनामदार ,,
डॉ. अरुण दि. रासने ,,
श्री. रमेश म. केंगे ,,
डॉ. विलास द. पोतनीस ,,
डॉ. तुकाराम चं. राठोड ,,
सौ. सुनीता वि. क्षीरसागर ,,
श्री. मधुकर सो. दंडवते ,,

**श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे** (कार्यकारी अधिकारी)

## संपादकीय





**एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थन्परित्यज्य ये,**
**सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थविरोधेन ये ।**
**तेऽमी मानुषराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये,**
**ये तुध्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ।।**

थोर समाजचिंतक, 'नीतीशतक'कर्ता, भर्तृहरी याने वरील प्रकारे समाजातील चार प्रवृत्तींच्या माणसांचे वर्णन केलेले आहे. संत, सामान्यजन, दुर्जन आणि राक्षस असे ते चार वर्ग आहेत. संतप्रवृत्तीची माणसे परोपकारार्थ स्वतःचा स्वार्थ दूर ठेवतात, सामान्य प्रवृत्तीची माणसे स्वतःचा स्वार्थ प्राधान्याने साधतात व नंतर परोपकाराचा विचार करतात, दुर्जन प्रवृत्तीचे लोक स्वतःच्या स्वार्थासाठी समोरच्याचे प्रसंगी वाईटही करतात आणि राक्षसी वृत्तीचे लोक हे दुसऱ्याचे वाईट करण्यासाठी स्वतःचेही नुकसान करण्यास मागेपुढे पहात नाहीत ! स्वतःचे नाक कापून दुसऱ्याला अवलक्षण दाखविणाऱ्या या आसुरी वृत्तीचे लोक अगदी रामायण - महाभारत काळापासून आजतागायत आपण पहात आहोत.

आपले साईबाबा संस्थान, जें गेले काही दिवस दुर्दैवाने नसत्या वादाचा विषय झाले आहे, तें अशा असुरी प्रवृत्तीच्या असंतुष्ट लोकांमुळेच ! या विघ्नसंतोषी असंतुष्टांना ना साईभक्तांबद्दल खरोखर आस्था आहे, ना शिरडीविकासाविषयी मनापासून प्रेम आहे. केवळ आपली संस्थानच्या विश्वस्त मंडळावर नेमणूक झाली नाही म्हणून वा आपल्या प्रस्थापित हितसंबंधाना बाधा आल्याने वा कोणत्या ना कोणत्या कारणास्तव आपले नाव प्रसारमाध्यमांत सतत येत रहावे एवढ्यासाठीच त्यांच्या या नसत्या केविलवाण्या उठाठेवी आहेत. साईबाबा त्रिकालज्ञानी असल्याने आपल्या या लटपटी त्यांच्या नजरेतून कशा सुटतील ? ''देह देवाचे मंदिर, आंत आत्मा परमेश्वर'' असे आपण म्हणतो. आपल्या अंतर्आत्म्यात विराजमान परमेश्वर म्हणजेच जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, सदासर्वदा भरून उरलेले श्री साईबाबा होय ! आपल्या अंतर्आत्म्यातील

## संपादकीय

परमेश्वर आपल्या भल्याबुऱ्या कार्याचा सर्वसाक्षी असतो. याचे उचित भान ठेवून आपण कोणतेही कार्य केले पाहिजे.

**तोरा मन दर्पण कहलाये।**
**भले बुरे सारे कर्मों को**
**देखे और दिखलाये।**

विख्यात गीतकार साहिर लुधियानवी यांच्या गीतातील हा संदेश प्रत्येकाने आपले कार्य करताना सतत स्मरण ठेवण्यासारखा आहे. **'सुख की कलिया, दुःख के कांटे, मन सबका आधार'** असे सांगून हा कवि म्हणतो -

**जग से चाहे भाग ले कोई**
**मन से भाग न पाये।**

पराचा कावळा करून एखादी गोष्ट भडकपणे मांडणे हा दुर्दैवाने अलिकडे काही वृत्तपत्रांचा एक अविभाज्य असा स्थाईभावच झालेला दिसतो. कोणतीही गोष्ट घडली तशीच ती साधेपणाने सांगितली - लिहिली तर किती लोक आपल्या वृत्तपत्राकडे आकर्षित होतील? म्हणून, वाचकांचे ध्यान आकृष्ट करण्यासाठी मनाचा मसाला लावणे, भडक मथळे देणे, ''कळते - समजते'' अशा शब्दांच्या कवचकुंडलांचा वापर करणे, हें अपरिहार्य मानले जाते व मग बऱ्याच वेळा भान सुटून बेभान वृत्तलेखन होते. हे सर्व करताना सत्यापासून फारकत होत आहे व वृत्तलेखन ही एक सामाजिक ज़बाबदारीदेखील आहे याकडे मात्र पार दुर्लक्ष होतें.

पारमार्थिक - भक्ती प्रचार - प्रसारासाठी वाहिलेल्या 'साईलीला'चे संपादकीय प्रथमच अशा काहीशा वेगळ्या विषयावर लिहावे लागत आहे. कारण प्रस्तुत अंकात संस्थानवरील विविध आरोपांबाबतचा साद्यंत खुलासा, जो शब्दशः व पूर्णपणे छापण्यावर मर्यादित जागेमुळे वृत्तपत्रांवर कांही बंधने साहजिकपणे पडतात, सर्व साईभक्तांना वस्तुस्थितीची यथायोग्य कल्पना यावी म्हणून आम्ही या अंकात दिलेला आहे.

संस्थानचे विश्वस्त मंडळ व 'साईलीला' मुख्यत्वे साईभक्तांना उत्तरदायी आहे. साईभक्तांनी हा खुलासा वाचून आपले मत - अभिप्राय 'साईलीला'स अवश्य कळवावे. याकरिताच हा नेहमीपेक्षा वेगळा लेखनप्रपंच. जय साईराम.

**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक,
'साईलीला'

# श्री साईंची शिळेवरील प्रतिमा श्री साईंच्या व्यक्तित्वाचे दर्शन



**श्री** साईबाबांची बैठक मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. डावा पाय जमिनीवर टेकून उजवा पाय डाव्या गुडघ्यावर वरच्यावर ठेवलेला, डावा हात उजव्या पायावर ठेवून उजवा हात डाव्या हाताखाली धरलेला, फाटकीच कफनी, पायात काही नाही, मुद्रा सरळ व एकटक समोर बघणारी, डोईस फडका आणि अगदी सरळ बसलेली अशी श्री साईबाबांची छबी पाहिली की, मनाला अवर्णनीय आनंद होतो. त्यांच्या त्या छबीचे तासन्तास ध्यान करीत बसून राहावसं वाटतं.

खरंच असं वाटतं की, श्री साईबाबांच्या छबीकडे डोक्यापासून पायापर्यंत, म्हणजे अगदी आपादमस्तक एकटक लावून त्यांचे तेज डोळ्यांत साठवून घेत बसावं. त्यांची छबी जरी साधीच दिसत असली, तरी तेज कमालीचं अवर्णनीय असं आहे. ज्या शिळेवर ते बसले आहेत ती एक भली मोठी आणि ओबड-धोबड अशी साधारण शिळा दिसते. डावा पाय जमिनीवर, म्हणजे अक्षरशः मातीत अनवाणीच टेकलेला, चेहऱ्यावर दाढी वाढलेली, फाटकी घळघळीत अंगातली कफनी आणि डोक्याला फडके वेष्टिलेली अशी त्यांची छबी, मागची दगड-मातीची भिंत आणि ती मोठ्ठी शिळा पाहिली की वाटते, त्या शिळेखाली आणि भिंतीमधील भगदाडांतून सर्प, पाली, विंचूसुद्धा असतील, नव्हे ते होतेच.

पण, श्री साईबाबा तर साक्षात् नारायण, अवघ्या विश्वाचे चालक तिथे फकिररूपाने बसलेत. साध्याच वेषातली श्री साईबाबांची शिळेवरची प्रतिमा; पण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं की, नजर आपोआप त्यांच्या पावलांकडे झुकते; आणि आपण मनोभावे नतमस्तक होतो. वाटतं, या पावलांची जोड मिळायला खरं तर सात जन्मांची पुण्याईच हवी.

श्री साईबाबांच्या त्या छबीतला त्यांचा तो चेहरा म्हणजे त्यावर आपल्या मनातल्या भावनांचे पडसाद स्पष्ट दिसतात. म्हणजे, तो जणू एक स्वच्छ आरसाच आहे. नजरेतलं तेज असं काही विलक्षण आहे की, ते जणू आपल्या अंतरंगात खोलवर नजर भिडवून आपल्याला आपल्या मनात जे काही लपलेले चांगले की वाईट, गंभीर की उदात्त भाव जसेच्या तसे त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त करून आपल्याला सूचवीत असतात. थोडक्यात म्हणजे, आपली सद्सद्विवेक बुद्धी काय म्हणते आहे ते आपण त्यांच्या चेहऱ्यावर वाचावं, आपलंच हृदय जणू ते आपल्याला उघड करून दाखवीत असतात. असं विलक्षण सामर्थ्य त्यांच्या नजरेत व चेहऱ्यावर आहे. त्यांची मुद्रा, प्रतिमा एकच असली तरी ती कधी हसतमुख दिसते, कधी रागावलेली दिसते, कधी गंभीर दिसते, कधी उदात्त दिसते, कधी मिष्कीलपणे हसताना दिसते, कधी नाराजी व्यक्त करताना दिसते, तर कधी अगदी प्रसन्न दिसते. जे त्यांचे अनन्य भक्त आहेत त्यांनाच त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव वाचता येतात; कारण तसे भक्तच त्यांच्याकडे तितक्या उत्कट प्रेमाने, भक्तीने, आदराने आणि मार्गदर्शन व्हावे या इच्छेने बघू शकतात.

श्री साईबाबांच्या प्रतिमेचे दर्शन म्हणजे साक्षात् श्री साईबाबांचे चालत्या-बोलत्या साईबाबांचे दर्शन. प्रतिमेतले साईबाबा आपल्याशी हसतात, बोलतात, सावधतेचा इशारा करतात, धीर देतात, आपल्याकडे वात्सल्यपूर्ण नजरेने बघतात, आपल्या मनातील गोष्टींसंबंधी नाराजी वा पसंती व्यक्त करतात.

प्रतिमा एकच; पण असंख्य भाव त्या प्रतिमेच्या चेहऱ्यावर वेळोवेळी दिसतात. त्यांच्या नजरेपासून कोणीही काहीही लपवू शकत नाही. कारण, तसा प्रयत्न करणाऱ्यास ते दर्शन देताच आपल्या नजरेने सांगतात, "तुम्ही कुठेही असा, काहीही करा; पण तुमच्या सर्व हालचालींच्या खबरा मला या इथे बसून इत्थंभूत समजतात. मी इथे बसूनच साऱ्या जगाची सूत्रे हलवीत असतो. मला सर्व माहीत आहे. तुम्ही काहीही माझ्यापासून लपवू शकत नाही. जो एकदा माझा झाला तो नेहमीकरिता माझा झाला. त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे. माझ्या इच्छेबाहेर तो काहीच करू शकत नाही. भक्ती आणि विश्वासयुक्त अंतःकरणाने, अनन्य भावाने, श्रद्धेने जो मजकडे पाहील आणि सबुरी धरील त्याच्या मी अंकित आहे. त्याच्यासाठी मी काय वाट्टेल ते करीन." त्यांनी हे आपल्या भक्तांना ठामपणे सांगून ठेवले आहे. आजही त्यांची प्रतिमा आपण त्यांचे तशा भक्तीने दर्शन घेतले, तर आपल्याला तसंच सांगत असताना ऐकू येईल.


इतकी बोलकी, माया लावणारी, सात्विक प्रेमाचा वर्षाव करणारी, धीर देणारी, आईसारखी साधीसुधी आणि तरीसुद्धा कोटी कोटी सूर्य-चंद्रांचे तेज फिके ठरवील अशी तेजस्वी आणि शीतल शांत प्रतिमा श्री साईबाबांची आहे.


**– विजय साने**
शिरडी.

# साई-जीवन-बोधामृत

होऊनियां प्रत्यक्ष दर्शन । निवाले नाहींत ज्यांचे नयन ।
तयांसी बाबांचें माहात्म्यश्रवण । पुण्यपावन घडावें ।।

(नित्य सलग पठणासाठी श्री साईसच्चरितातून संकलित 'श्री साईसच्चरितसार')







श्रवणें साईगुणश्रवण। मनें साईमूर्तीचें ध्यान। चित्तें अखंड साईचिंतन। संसारबंधन तुटेल ।। जयासी बाणली ही एक वृत्ती। सदासर्वदा ही एक स्थिती। सुखशांती समाधान चित्तीं। परमप्राप्ती ती हीच ।। साई आनंदवृत्तीची खाण। असलिया भक्त भाग्याचा जाण। परमानंदाची नाहीं वाण। सदैव परिपूर्ण सागरसा ।। पाहतां श्रीसाईंचें मुख। हरून जातसे तहानभूक। काय तयापुढें इतर सुख। पडे भवदुःखविस्मृती ।। पाहतां बाबांचे नयनांकडे। आपआपणां विसर पडे। आंतूनि येतीं जैं प्रेमाचे उभडे। वृत्ती बुडे रसरंगीं ।। साईदर्शनीं हीच नवाई। दर्शनें वृत्तीसी पालट होई। पूर्वकर्मांची मावळे सई। वीट विषयीं हळूहळू ।। पूर्वील कित्येक जन्मांच्या पुण्यगांठी। ती ही साईमहाराज-भेटी। हा साई एक मीनलिया दृष्टीं। सकल सृष्टी साईरूप ।। स्वयें जरी निर्विकारी। साई नटनाटकी अवतारी। वर्ते मायाकार्यानुसारी। जैसा व्यवहारीं प्रापंचिक ।। प्रीति नाहीं नाशिवंतीं। आत्मस्वरूपीं रंगली वृत्ती। लक्ष एक परमप्राप्ती। काय ते स्थिती वर्णावी ।। ऐहिकाचा न उत्कर्षापकर्ष। आमुत्रिकाचा न हर्षामर्ष। अंतरंग निर्मल जैसा आदर्श। वाचा वर्षत अमृत सदा ।। राजा रंक दरिद्री दीन। जयाचे दृष्टीं समसमान। स्वयं ठावा न मानापमान। भूतीं भगवान भरलेला ।। जनासवें बोले चाले। पाही मुरळ्यांचे नाच चाळे। गज्जल गाणें ऐकतां डोले। रेस न हाले समाधि ।। 'अल्ला' नामाची जया मुद्रा। जग जागतां जया ये निद्रा। जागे जगासी लागतां तंद्रा। शांत समुद्रासम उदर ।। आश्रम-निश्चय कांहीं नकळे। कांहीं निश्चित कर्मा नातळे। बहुधा बैसल्या ठायींचा न ढळे। व्यवहार सगळे जो जाणे ।। दरबाराचा बाह्य थाट। गोष्टी सांगे तीनशें साठ। ऐसा जरी नित्याचा थाट। मौनाची गांठ सोडीना ।। भिंतीस टेकूनि उभे असती। सकाळ दुपारा फेरी फिरती। लेंडीवरी वा चावडीस जाती। आत्मस्थिती अखंड ।। धन्य शिरडीचे तृण पाषाण। अनायासें जयां अनुदिन। घडलें बाबांचें चरणचुंबन। पदरजधारण मस्तकीं ।। साई स्वयें द्वंद्वातीत। कधीं न उद्विग्न वा उल्लसित। सदैव निजस्वरूपीं स्थित। सदोदित

सन्मात्र ॥ ''गरिबी अव्वल बादशाही। अमिरी से लाख सवाई। गरिबों का अल्ला भाई'' । अक्षयीं साई वदत कीं ॥ नलगे जरी कोणाचा सांगात। तरी दिवसा भक्तपरिवाराक्रांत। अस्तमानानंतर शिरडींत। पडक्या मशिदींत निजावें ॥ चिलीम तमाखू टमरेल। अंगांत कफनी पायघोळ। माथ्यासी फडका धवल। सटका जवळ सर्वदा ॥ तें धूत वस्त्र एक धवल। वामकर्णामागें सुढाळ। जटाजूटसम देऊनि पीळ। गुंडाळी तो शिरासी ॥ या वसनाचें आच्छादन। आठाठ दिन स्नानविहीन। पायीं जोडा ना वहाण। एक आसन गोणाचें ॥ पोत्याचा तुकडा एक। तयावरी नित्य बैठक। तक्या कैसा तो नाहीं ठाऊक। आराणूक कैसेनी ॥ तोंवरी तें जीर्ण तरट। तीच त्यांची आवडती बैठक। सदा सर्वदा तैशीच निष्टंक। अष्टौ प्रहर ते जागीं ॥ तेंचि आसन वा आस्तरण। कांसे एक कौपीन परिधान। नाहीं दुजें वस्त्र प्रावरण। शीतनिवारण एक धुनी ॥ दक्षिणाभिमुख आसनस्थ। कठड्यावरी वाम हस्त। समोर धुनीकडे अवलोकीत। बाबा मशिदींत बैसत ॥ अहंकार-वासनासमवेती। नानाविध वृत्तींच्या आहुती। प्रपंचवृत्ती समग्र हविती। युक्तिप्रयुक्तीं धुनींत। ऐसिया त्या प्रखर कुंडा। लाविला ज्ञानाभिमानाचा ओंडा। ''अल्ला-मालिक'' सदैव तोंडा। तयाचा झेंडा अखंड ॥ मशीद तरी ती केउती। अवघी जागा दोन खण ती। त्यांतचि बसती उठती निजती। भेट देती समस्तां ॥ गादी तक्या हें तों आतां। भक्तसमुदाय मिळाला भंवता। आरंभीं तयांच्या निकट जातां। सकळांस निर्भयता नव्हतीच ॥ सन एकोणीसशें बारा। तेथूनि नवा प्रकार सारा। मशिदीचिया स्थित्यंतरा। आरंभ खरा तेथूनि ॥ ढोपर ढोपर जमिनीसी। खड्डे होतें मशिदीसी। एके निशींत झाली फरसी। भावासरसी भक्तांच्या ॥ मशिदीचिया वसती आधीं। बाबा रहात तकियामधीं। तेथेंचि कित्येक कालावधी। अबाधित रमले ते ॥ तेथेंचि चरणीं बांधोनि घुंगुर। खंजिरीचिया तालावर। नाचावें बाबांनीं अतिसुंदर। गावेंही मधुर प्रेमानें ॥ आरंभीं साई समर्थांस। दीपोत्सवाची मोठी हौस। तदर्थ स्वयें दुकानदारांस। तेल मागावयास ते जात ॥ घेऊनियां टमरेल हातीं। वाण्यातेल्यांच्या दुकानांप्रति। स्वयें तेलाची भिक्षा मागती। आणूनि भरती पणत्यांत ॥ पणत्या लावीत झगझगीत। देउळीं आणि मशिदींत। ऐसें कांहीं दिवसपर्यंत। सदोदित चाललें ॥ दीपाराधनीं बहु प्रीत। दिवाळीचाही दीपोत्सव करीत। चिंध्या काढूनि वाती वळीत। दीप उजळीत मशिदीं ॥ शिरीं ठेवितां करकमल। अनेका जन्मींचे परिपक्व मल। जाती धुऊनि होती निर्मल। भक्त प्रेमळ साईंचे ॥ रूप पाहतां तें गोमटें। परमानंदें कंठ दाटे। नयनीं आनंदा पाझर फुटे। हृदयीं प्रकटे अष्टभाव ॥ सोहंभावास जागवीत। निजानंदास प्रकटवीत। ठायींच मीतूंपणा विरवीत। सामरस्यें अद्वैत मिरवी ॥ असो जेव्हां मशिदीसी। निशींत एका झाली फरसी। तेथूनि मग दुसरेच दिवशीं। बाबा गादीसीं बैसले ॥ हिंदू म्हणावें जरी तयांस। मशिदींत सदा निवास। यवन म्हणावें तरी हुताश। अहर्निश मशिदींत। मशिदींत जात्याचें दळण। मशिदींत घंटाशंखवादन। मशिदींत अग्निसंतर्पण। मुसलमान कैसे हे ॥ मशिदींत सदैव भजन। मशिदींत अन्नसंतर्पण। मशिदींत अर्घ्य-पाद्य-पूजन। मुसलमान कैसे हे। म्हणावी जरी म्लेंच्छ जाती। ब्राह्मणोत्तम पूजन करिती। अग्निहोत्री लोटांगणीं येती। त्यागूनि स्फिती सोंवळ्याची ॥ तैसें संग्रहीं गव्हांचें पोतें। दळाया मशिदींत असे जातें। पाखडावया सूपही होतें। न्यून नव्हतें संसारास ॥ सभामंडपीं शोभायमान। सुंदर खासें तुलसीवृंदावन। तेथेंचि एक लांकडी स्यंदन। अति सुलक्षण कांतीव ॥ होतें कांहीं पुण्य गांठीं। तेणें या सद्वस्तूची झाली भेटी। ऐशी दृढ सांठवा हृदयसंपुटीं। पडेना तुटी आमरणान्त ॥ कीड मुंगी सूकर श्वान। पशु पक्षी मनुष्य जाण। राजा रंक थोर सान। समसमान पाही जो ॥ दिसाया जरी शिरडीनिवासी। साडेतीन हाताची मिराशी। तरी ते सर्वहृदयवासी। पुण्यराशी महाराज ॥ अंतरीं निःसंग उदास। बाहेर लोकसंग्रहाचा सोस। अंतरीं जरी परम निराश। बाहेर पाश भक्तांचा ॥ अंतरीं अत्यंत निष्काम। बाह्यतः भक्तार्थ अति सकाम। अंतरीं निजशांतीचें धाम। बाह्यप्रकाम संतप्त ॥ अंतरीं परब्रह्मस्थिती। बाहेर दावी पैशाचवृत्ती। अंतरीं अद्वैतप्रीति। बाह्यतः गुंती विश्वाची ॥ कधीं पाही प्रेमभावें। कधीं पाषाण घेऊनि धांवें। कधीं शिव्या-शापांतें द्यावें। कधीं कवटाळावें स्वानंदें ॥ कधीं शांत दांत उपरत। तितिक्षू सदा समाहित। आत्मस्थित आणि आत्मरत। प्रसन्नचित्त भक्तांसी ॥ एकासनीं नित्य लीन। नाहीं जयासी गमनागमन। सटका जयाचें दंडनिधान। तूष्ण्यवस्थान निश्चित ॥ नाहीं कीर्ति-वित्तेषणा। भिक्षाचर्य प्राणरक्षणा। करूनि ऐशिया योगारोहणा। कालक्रमणा करी जो ॥ प्रत्यक्ष संन्यासवेष यति। सटका तोचि दंड हातीं। ''अल्ला-मालिक'' वाक्यानुवृत्ती।

भक्तप्रीति अखंड ॥ ऐशी साईंची सगुणमूर्ती। मनुष्यरूपें अभिव्यक्ती। पूर्वपुण्यार्जित ही संपत्ती। अवचित हातीं लाधली ॥ तयासी जे मनुष्य भाविती। मंदभाग्य ते मंदमती। विचित्र जयांची दैवगती। तयां हे प्राप्ती कैसेनी ॥ साई आत्मबोधाची खाण। साई आनंदविग्रहपूर्ण। धरा कास तयाची तूर्ण। भवार्णव संपूर्ण तराया ॥ खरेंच जें अपार अनंत। भरलें आब्रह्मस्तंबपर्यंत। ऐसें जें निरंतर अभिन्न अत्यंत। मूर्तिमंत तें बाबा ॥ कलियुगाचा कालप्रसार। चार लक्ष बत्तीस हजार। भरतां स्थूलमानें पांच हजार। झाला अवतार बाबांचा ॥ कोणा न सांगे आसन। प्राणापान वा इंद्रियदमन। मंत्र तंत्र वा यंत्र-भजन। फुंकणें कान तेंही ना ॥ लौकिकीं दिसती लोकाचारी। परी अंतरींची आणिक परी। अत्यंत दक्ष व्यवहारीं। न ये कुसरी दुजयातें ॥ भक्तार्थ धरिती आकार। तदर्थचि तयांचे विकार। हे संतांचे लौकिकाचार। जाणा साचार संकलित ॥ काय तें मनोहर गोमटें ध्यान। मशिदीचे कडेवर राहून। करीत एकेकां उदीप्रदान। भक्त-कल्याणहेतूनें ॥ संसार मिथ्या जयाचें ज्ञान। ब्रह्मानंदीं अखंड लीन। मन सदैव उफललें सुमन। साष्टांग नमन तयातें ॥ डोळां जैं घाली ज्ञानांजन। ठायींच पाडी निजनिधान। ऐसें जया साईचें महिमान। साष्टांग वंदन तयातें ॥ बाबाच सर्वांचें अधिष्ठान। तयांसी केऊतें आसन। त्याहीवरी रौप्य सिंहासन। भक्तभावन परी बाबा ॥ बहुतां दिसांची जुनी बैठक। गोणत्याचा तुकडा एक। त्यावरी घालिती भक्त भाविक। गादी सुरेख बैसाया ॥ मागील टेकायाची भिंत। तेथें तक्या ठेविती भक्त। जैसें भक्तांचें मनोगत। बाबाही वागत तैसेच ॥ वास्तव्य दिसे शिरडींत। तरी ते होते सर्वगत। हा अनुभव निजभक्तांप्रत। साई नित्य दाखवीत ॥ स्वयें जरी निर्विकार। अंगिकारीत पूजा-उपचार। भक्तभावार्था-नुसार। प्रकार सर्व स्वीकारीत ॥ कोणी करीत चामरांदोलन। कोणी तालवृन्त-परिवीजन। सनया चौघडे मंगल वादन। कोणी समर्पण पूजेचें ॥ कोणी हस्त-पादप्रक्षालन। कोणी अत्तर-गंधार्चन। कोणी त्रयोदशगुणी तांबूलदान। निवेदन महानैवेद्या ॥ कोणी दुबोटी आडवें गंध। शिवलिंगा तैसें चर्चिती सलंग। कोणी कस्तूरीमिश्रित सुगंध। तैसेंचि चंदन चर्चीत ॥ असो हे सर्वोपचार करवूनि घेती। केवळ तयांच्या आलिया चित्तीं। ना तों पूजेचीं ताटें भिरकाविती। रूप प्रकटिती नरसिंह ॥ हें रूप कां जैं प्रकटिजेल। कोण धीराचा पाशीं ठाकेल। जो तो जीवाभेणें पळेल। वृत्ती खवळेल ती जेव्हां ॥ कधीं अवचित क्रोधवृत्ती। भक्तांवरी आग पाखडिती। कधीं मेणाहूनि मऊ भासती। पुतळा शांतिक्षमेचा ॥ कधीं काळाग्निरूप भासती। भक्तांसी खड्गाचे धारेवरी धरिती। कधीं लोण्याहूनि मवाळ होती। आनंदवृत्ती विलसती ॥ जरी क्रोधें कांपले थरथरां। डोळे जरी फिरविले गरगरां। तरी पोटीं कारुण्याचा झरा। माता लेंकुरा तैसा हा ॥ क्षणांत वृत्तीवरी येतां। हांका मारूनि बाहती भक्तां। म्हणती "मी कोणावरीही रागावतां। ठावें न चित्ता माझिया ॥ माय हाणी लेंकुरा लाता। समुद्र करी नदियां परता। तरीच मी होय तुम्हां अव्हेरिता। करीन अहिता तुमचिया ॥ मी माझिया भक्तांचा अंकिला। आहें पासींच उभा ठाकला। प्रेमाचा मी सदा भुकेला। हांक हांकेला देतसें" ॥ संत माझी सचेतन मूर्ती। कृष्ण स्वयें म्हणे भागवतीं। कोणा न ठावी ही स्पष्टोक्ती। उद्धवाप्रती हरीची ॥ म्हणोनि भक्तकल्याणार्थ। दयाघन सांईसमर्थ। वदते झाले जें सत्य सार्थ। परिसा अतिविनीत होऊनि ॥ "पाप जयांचें विलया गेलें। ऐसे जे पुण्यात्मे वहिले। तेचि माझे भजनीं लागले। खूण लाधले ते माझी ॥ "साई साई" नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्याहाल।






या बोला विश्वास ठेवाल। पावाल कल्याण निश्चयें॥ नलगे मज पूजासंभार। षोडश वा अष्टोपचार। जेथें भाव अपरंपार। मजला थार ते ठायीं''॥ ऐसे बाबा वेळोवेळां। बोलूनि गेले भक्तजिव्हाळा। आतां आठवूनि त्या प्रेमळ बोला। करूं विरंगुळा मनासी॥ ऐसा हा दयाळू साईसखा। शरणागतांचा पाठिराखा। भक्तकैवार घेऊनि निका। नवल विलोका केलें तें॥ बाबा न बाह्यतः कांहींच करीत। स्थान सोडूनि कोठें न जात। परी बैसल्या स्थळीं सर्व जाणत। अनुभव देत सकळां जनां॥ दिसे जरी परिवारिला भक्तीं। परी न कोठेंही आसक्ती। स्वस्वरूपीं चित्तवृत्ती। दृश्यनिवृत्ती सर्वदा॥ येतां कोणीही दर्शनासी। लागतां चरण वंदावयासी। असो हिंदु यवन वा पारसी। दक्षिणा त्यापासीं मागत॥ ती तरी काय थोडी थोडकी। रुपये एक दोन वा पंचकडी। मागत शत सहस्र लक्ष कोडी। स्वेच्छा परवडी दक्षिणा॥ दिधली तरी आणीक आणा। संपली म्हणतां उसनी घ्याना। जेव्हां कोठें उसनीही मिळेना। तेव्हां मग याचना थांबवीत॥ आणीक तयां भक्तां म्हणत। ''फिकीर न करीं या यत्किंचित। देईन तुजला रुपये मी मस्त। बैसें तूं निश्चिंत मजपाशीं॥ दुनिया में किसी का कोई है। और किसी का कोई है। अपना तो यहां कोई नहीं है। अपना अल्ला ही अल्ला है॥ करी जो मज जीव प्राण। ऐसियाचीच मज वाण। तो देतां मज एक गुण। देतों मी शतगुण तयासी''॥ असेना मोठा लक्षाधीश। तयासही दक्षिणा मागावयास। निर्धना घरीं जावयास। करीत आज्ञेस महाराज॥ मोठा धनाढ्य अथवा रंक। गरीब दुर्बळ अथवा खंक। एक उणा वा एक अधिक। नाहीं ठाऊक साईंस॥ वंदूनियां आज्ञा शिरीं। निरभिमान होऊनि अंतरीं। बाबांलागीं याचना करी। जाऊनि घरीं गरिबांच्या॥ तरी या पोटीं हाच सारांश। दक्षिणेचें करूनि मिष। बाबा शिकवीत निजभक्तांस। वरावयास सलीनता॥ आरंभीं बहुतकालपर्यंत। बाबा कांहींही नव्हते घेत। जळक्या काड्यांचा संग्रह करीत। तोच कीं भरीत खिशांत॥ असो भक्त वा अभक्त। कोणाहीपाशीं कांहीं न मागत। दिडकी दुगाणी ठेविल्या तेथ। तमाखू आणीत वा तेल॥ तमाखूचें फार प्रेम। ओढीत विडी अथवा चिलीम। त्या चिलिमीची सेवाही निःसीम। बहुधा निर्धूम्र नसे ती॥ पुढें आलें कोणाचे मना। रिक्तहस्तें दक्षिणेविना। जावें कैसें संतदर्शना। तदर्थ दक्षिणा ते घेत॥ दिडकी दिधल्या घालीत खिसां। ठेवितां कोणी ढबू पैसा। परत करीत जैशाचा तैसा। क्रम हा ऐसा बहुकाळ॥ परी पुढें कांहीं कालें। साईबाबांचें माहात्म्य वाढलें। भक्तांचे थवे येऊं लागले। पूजन चाललें विधिपूर्वक॥ बाबाही दकारें भक्तांप्रत। भक्तहितार्थ तेंचि मागत। करा दया दान व्हा दान्त। सौख्य अत्यंत लाधाल॥ परम दयाळू साई समर्थ। साधावया भक्तहितार्थ। तयांलागीं दक्षिणा मागत। शिक्षणही देत त्यागाचें॥ साई महाराज ज्ञानराशी। जाणे बैसोनियां मशिदीसी। भूत-भविष्य-वर्तमानासी। कवण्याही देशीं घडो तें॥ भूतमात्रीं एकात्मता। असलियावीण साईसमर्था। येईल कां हा प्रकार अनुभवितां। अथवा सांगतां दुजियांतें॥ ''रुचेल तेंच बोलावें। पचेल तितुकेंचि अन्न खावें। नातरी व्यर्थ अजीर्ण व्हावें। हें तों ठावें सकळिकां॥ माझा भांडार भरपूर आहे। देईन जो जो जें जें चाहे। परी ग्राहकाची शक्ती पाहें। देतों मी साहे तेंच कीं॥ ऐकाल जरी हें लक्ष देऊन। पावाल तुम्ही कृतकल्याण। या पवित्र मशिदींत बैसून। असत्य भाषण न करीं मी''॥ ही संतवाक्यसुधासरिता। भावार्थें येथें बुडी देतां। अंतर्बाह्य लाधे शुद्धता। क्षाळण होतां मळाचें॥ ऐसा साईनाथांचा महिमा। वर्णूं जातां न पुरे सीमा। उपमूं कैसें त्या निरुपमा। शुद्धप्रेमाआधीन तो॥ माउली ती सकळांची। विश्रांती आर्तश्रांतांची। कल्पवल्ली आश्रितांची। दीनादुबळ्यांची जी छाया॥ संसारावरी पाणी देऊन। गिरिकपाटीं मौन धरून। एकांतवास स्वीकारून। निजकल्याणैकदक्ष जो॥ ऐसे संत असती बहुत। केवळ जे साधिती निजस्वार्थ। अथवा केवळ निजपरमार्थ। काय कीं अर्थ इतरांतें॥ तेवीं न साईबाबा महंत। नसतां आप्तेष्ट गणगोत। घरदार वा जायासुत। प्रपंचांत राहती॥ करतलभिक्षा पांच घरा। तरुतलवास अष्टौ प्रहरा। मांडूनि थिता प्रपंच-पसारा। व्यवहार सारा शिकविती॥ साधूनि निज ब्रह्मस्थिती। जनतेच्या कल्याणा झिजती। ऐसे संत महामति। विरळा जगतीं असतील॥ धन्य तो देश धन्य तें कुळ। धन्य तीं आईबापें निर्मळ। धन्य त्यांचा कुसवा सोज्वळ। प्रसवला निर्मळ हें रत्न॥ अनायासें परिस लाधला। पाषाण समजूनि बहुतीं झुगारिला। शिरडींत या परम भागवताला। कोणीं न ओळखिला बहुकाळ॥ शिरीं ठेवी अभयहस्त। इडा पिडा करोनि उद्ध्वस्त। जाळोनि पातकाच्या राशी समस्त। उदी मस्तकीं फांसी तो॥ समर्थ साई ज्ञाननिधी। जया भक्ताची जैसी बुद्धी। आधीं निर्धारून पात्रशुद्धी। ज्ञानसमृद्धी वितरत॥ तयांस पूर्ण अंतर्ज्ञान। तयांस आधींच सर्वांची जाण। जयास जैसें योग्य साधन। तयाचें नियमन तैसेंच॥ जैसा जयाचा

अधिकारी। तयाचा आधींच करूनि विचार। योग्यायोग्यतेनुसार। भक्तांचा भार बाबांना।। तैसेच आम्ही दिसाया थोर। परी त्या सिद्ध साईसमोर। खरेच आम्ही पोरांहूनि पोर। विनोदीं आतुर सर्वदा ।। विनोदांचें बाबा आगर। जे जे ठायीं जयासी आदर। तें तें यथेष्ट पुरवूनि समग्र। राखीत अव्यग्र भक्तांस।। देशोदेशींचे लोक जाती। साईपदरजीं लोळती। महाराजांच्या आज्ञेंत वर्तती। अभीष्ट पावती सेवेनें।। ऐसी तयांची प्रसिद्ध कीर्ति। आबालवृद्ध संर्व जाणती। तयांसी येतां काकुळती। दुःखनिवृत्ती लाधाल ।। शिरडी सांप्रत पवित्र स्थान। यात्रा वाहे रात्रंदिन। तुम्हीही पहा अनुभव घेऊन। संतदर्शन हितकारी।। आपण जरी मशिदीं बसती। कोणाही कांहीं कार्य नेमिती। तयासी देऊनियां निजशक्ती। करवूनि घेती तें कार्य।। जरी सर्वांहूनि श्रेष्ठ ज्ञान। बाबा उपदेशीत रात्रंदिन। तरीही भक्तिमार्गाचें अवलंबन। सर्वसाधारण निवेदीत।। म्हणूनि साई दयाघन। बहुधा निज शिष्यांलागून। भक्ती आणि नामस्मरण। याचेंच विवरण करीत।। ज्ञानाहूनही श्रेष्ठ ध्यान। अर्जुनालागीं कथी भगवान। तुटावया भक्तभवबंधन। साईही साधन हें वदे ।। अंतरंग जैसें प्रेमळ। बोलही तैसेच मंजुळ। रंजल्यागांजल्यांचे कनवाळ। दीनदयाळ श्रीसाई।। कराया भवसंतापशमन। भक्तचकोर-तृषापनयन। वर्षलें जे बाबा चिद्घन। स्वानंदजीवन तें सेवा।। रोज दुपारा जेवणाआधीं। भक्त जाऊनियां बैसती मशिदीं। करिती गंधाक्षत-अर्घ्य-पाद्यादी। पूजा सविधी बाबांची ।। तदनंतर ती पंचारती। बापूसाहेब जोग करिती। भक्तिप्रेमें ओंवाळिती। आरत्या म्हणती भक्तजन ।। माध्याह्नसमयींची ही आरती। नरनारी मिळूनियां करिती। स्त्रिया मशिदींत वरती। पुरुष खालती मंडपीं।। मंगल-वाद्यांचिया गजरीं। तासाचिया झणत्कारीं। आरत्या म्हणती उच्चस्वरीं। हर्षनिर्भरीं तेधवां।। बाबा निजस्थानीं स्थित। स्वस्थमनें चिलीम पीत। समोर जोग पंचारती ओंवाळीत। घंटा वाजवीत वामकरें।। साईस्वरूप यथार्थ ज्ञान। स्वयें जो परिपूर्ण विज्ञानघन। हेंच तयांचें ध्यान अनुष्ठान। हेंच दर्शन तयांचें ।। साई नाहीं तुमचा वा आमुचा। तो तों सर्वभूतस्थ साचा। सूर्य जैसा सकल जगाचा। हा सकळांचा तैसाच ।। आम्ही सकळ केवळ बाहुलीं। सूत्रधार साई माउली। स्वयें न बोलतां उपासना भली। हातीं दिधली अचूक ।। साईंस उपदेशा न स्थळ। नलगे समय काळवेळ। बसतां उठतां चालतां निखळ। सहजचि सकळ उपदेश ।। बाबा पूर्ण अंतर्ज्ञानी। देती वेळींच भक्तांस शिकवणी। कोणास कांहीं व्यवहारीं प्रशस्त। वर्तनाची लावीत शिस्त ।। काय तो साई सिद्धाश्रम। दर्शनें निवे संसारश्रम। निकटवर्ती भवभ्रम। दवडी अविश्रम सहवासें।। माध्यान्हीं आरतीपाठीं। येऊनि मशिदीच्या कांठीं। महाराज अति कृपादृष्टीं। उदी वांटीत भक्तांस ।। भक्तही प्रेमळ उठाउठी। घालीत समचरणीं मिठी। उभ्यानें मुख न्याहाळितां दृष्टी। भोगीत वृष्टी उदीची ।। बाबाही भरभरोनि मुष्टी। घालीत भक्तांच्या करसंपुटीं। अंगुष्ठें लावीत तयांच्या ललाटीं। प्रेम पोटीं अनिवार।। ''जा भाऊ जा जेवावयास। जा अण्णा जा तूं खा सुग्रास। जा अवघे जा निजस्थानास''। प्रत्येकास वदत ते ।। आतां जरी तें पाहूं न मिळे। परी ते सर्व गतसोहळे। शिरडीस त्या त्या स्थानीं त्या त्या वेळे। दृढ ध्यानबळें दिसतात ।। असो वा नसो विनोद वाणी। कदा न ती होणें निष्कारणी। बाबांच्या एकेका अक्षरागणीं। असती खाणी अर्थाच्या ।। बाबा जें जें वाचे वदत। बोल न्हेत तें ब्रह्मलिखित। एकही अक्षर न होई व्यर्थ। साधील कार्यार्थ वेळेवर।। ज्ञानियांचा शिरोमणी। मिथ्या नव्हे तयाची वाणी। निजभक्ताची पुरवावी मागणी। ब्रीद हें





चरणीं बांधिलें ।। ऐसी बाबांची अमोघ वाणी। प्रचीति मिळविली अनेकांनीं। अप्राणान्त शिरडी न सोडूनि। जनीं विजनीं प्रकटत ।। कोणास मच्छिंदरगडावर। कोणास कोठेंही असो शहर। कोल्हापूर सोलापूर रामेश्वर। इच्छामात्र प्रकटत ।। कोणास आपल्या बाह्यवेषीं। कोणास जागृतीं वा स्वप्नविशेषीं। दर्शन देत अहर्निशीं। पुरवीत असोशी भक्तांची ।। ऐसे अनुभव एक ना दोन। किती म्हणोनि करावे वर्णन। शिरडींत जरी वसतिस्थान। अलक्ष्य प्रस्थान कोठेंही ।। जैसीं सार्वभौम राजाचीं ठाणीं। वसविलीं असतीं ठिकठिकाणीं। तेथ तेथ अधिकारी नेमूनि। अबादानी संपादिती ।। तैसाच हा स्वानंदसम्राट। जागोजागीं होऊनि प्रकट। चालवी हा निजराज्यशकट। सूत्रें अप्रकट हालवी ।। कर्णोपकर्णीं परिसिली वार्ता। साईदर्शनें निवारें चिंता। विनोद गोष्टी वार्ता करितां। सहज सत्पथा लाविती ते ।। आणीक एक हें प्रत्यंतर। असतां शंभर कोसांचें अंतर। साई जाणें सर्वाभ्यंतर। खरे अंतर्ज्ञानी ते ।। आणीक एक झाला निवाड। असोत मध्यें पर्वत पहाड। कांहीं न साईंच्या दृष्टिआड। गुप्तही उघड त्यां सर्व ।। अगाध साईनाथांचा महिमा। अगाध तयांच्या कथा परमा। अगाध साईचरित्राची सीमा। मूर्त परब्रह्मावतार ।। भक्तांची भावी संकटावस्था। ठाऊक आधींच साईसमर्था। थट्टामस्करी विनोद वार्ता। हंसतां खेळतां टाळिती ।। बाबा तव स्वरूपदर्शना-। वांचून कांहीं रुचेना मना। वाटे आणावें तेंच ध्याना। ठेवावें लोचनांसमोर ।। केवळ शुद्धज्ञानमूर्ती। व्हावया आत्यंतिक सौख्यपूर्ती। नाहीं तुझिया पायांपरती। आणीक गती आम्हातें ।। काय ती तव नित्याची बैठक। दर्शना येती भक्त अनेक। ठेवूनियां पायीं मस्तक। प्रेमें निजसुख लुटीत ।। तोही तुझा पाय कैसा। शाखा - चंद्रन्याय जैसा। पादांगुष्ठ कवळी तैसा। दर्शनजिज्ञासा पूरवी ।। कृष्णपक्षाची पंचदशी। अमावास्या अंधारी निशी। उलटतां चंद्रदर्शनाची असोसी। होते सकळांसी साहजिक ।। सरतां वद्य पक्षाची निशा। चंद्रदर्शनीं उपजे आशा। जो तो अवलोकी पश्चिम दिशा। दृष्टी आकाशा लावूनि ।। ती निजभक्तांची असोसी। पुरविसी निज पायांपासीं। वामजानूवरी दक्षिण पायासी। ठेवूनि बैससी जे समयीं ।। वामकर तर्जनी मध्यमांगुळी। शाखा बेचकें अंगुष्ठ जो कवळी। त्या दक्षिणपादांगुष्ठाजवळी। नखचंद्र झळाळी बीजेचा ।। दर्शनाची जिज्ञासा थोर। एरव्हीं नभीं दिसेना कोर। ज्ञाता मग या बेचक्यासमोर। आणोनि नजर लावीं म्हणे ।। पहा आतां या बेचक्यामधून। समोर होईल चंद्रदर्शन। कोर जरी ती होती लहान। जाहली तेथून दृग्गोचर ।। म्हणवूनि शाखा-चंद्रन्याय। अंगुष्ठीं तर्जनी-मध्यमा उभय। ठेवूनि दावी साईमाय। सोपा उपाय निजभक्तां ।। म्हणे होऊनि निरभिमान। सर्वांभूतीं खालवा मान। करा एक अंगुष्ठध्यान। सोपें साधन भक्तीचें ।। शिरडी जाहलें पुण्यक्षेत्र। बाबांचेनि तें अति पवित्र। यात्रा वाहे अहोरात्र। येती सत्पात्र पुण्यार्थी ।। दाही दिशांसी जयांची साक्ष। पटून राहिली प्रत्यक्ष वा परोक्ष। साईवेषें हा कल्पवृक्ष। अवतरला प्रत्यक्ष शिरडींत ।। अकिंचन वा संपत्तिमान। देखे समस्तां समसमान। दावून कांहीं अतर्क्य विंदान। भक्तकल्याण साधी जो ।। काय ती निःसीम प्रेमळता। नैसर्गिक ज्ञानसंपन्नता। तैसीच आत्यंतिक सर्वात्मभावता। धन्य अनुभविता भाग्याचा ।। कधीं दृढ मौनधारण। हेंच जयांचें ब्रह्मव्याख्यान। कधीं चैतन्य-आनंदघन। भक्तगणपरिवेष्टित ।। कधीं गूढार्थध्वनित बोलणें। कधीं थट्टेनें विनोद करणें। कधीं संदिग्धता सोडून देणें। कातावणें चालावें ।। कधीं भावार्थ कधीं विवेक। कधी उघडें निश्चयात्मक। असे अनेकीं अनेक। उपदेश देख करीत ते ।। ऐसें हें साईसमर्थाचरित। मनोबुद्धिवाचातीत। अकळ करणी अकल्पित। अनिर्ज्ञात अवचित ।। धणी न पुरे मुख अवलोकितां। धणी न पुरे संभाषण करितां। धणी न पुरे वार्ता परिसतां। आनंद चित्ता न समाये ।। मोजूं येतील पर्जन्यधारा। बांधूं येईल मोटे वारा। परी या साईंच्या चमत्कारा। कवण मापारा मोजील ।। मशिदींत जाऊन बैसतां। बाबांचे चरणीं मस्तक ठेवितां। तंव बाबा वदती "आतां पाहीं। द्वारकामाई ती हीच ।। हीच आपुली द्वारकामाता। मशिदीचे या अंकीं बैसतां। लेंकुरां देई ती निर्भयता। चिंतेची वार्ता नुरेचि ।। मोठी कृपाळू ही मशीदमाई। भोळ्या भाविकांची ही आई। कोणी कसाही पडो अपायीं। करील ही ठायींच रक्षण ।। एकदां हिचे जो अंकीं बैसला। बेडा तयाचा पार पडला। साऊलींत हिचे जो पहुडला। तो आरूढला सुखासनीं" ।। किती तरी दया पोटीं। काय ती त्यांची अंतर्दृष्टी। जाणूनि पुढील वेळ ओखटी। वार्ता गोमटी कथियेली ।। दर्शनाचें माहात्म्य दाविलें। मशिदीचें महत्त्व ठसविलें। निजप्रेम निदर्शना आणिलें। सहज लीलेकरून ।। आम्ही तयांस मानूं अवतारी। कारण लक्षणें तींच कीं सारीं। परी "मी बंदा अल्लाचिया पदरीं"। स्वयें येपरी वदत ते ।। जरी स्वयें अवतार। दावी पूर्ण लोकाचार। शुद्ध वर्णाश्रम-आचार।

योग्य प्रचार चालवी ।। कधीं कोणाची बरोबरी। करी न करवी कवण्याही परी। पाही जो विश्वंभर चराचरीं। तयासीं हारीच साजिरी ।। न कोणाची अवगणना। कोणासही तुच्छ लेखीना। भूतमात्रीं नारायणा। चैतन्यघना पाही तो ।। कधीं न म्हणवीत ''अनल हक्क''। मी एक परमेश्वराचा पाईक। गरीब मी ''यादेहक्क''। ''अल्लामालिक'' जप नित्य ।। बाबांस नाहीं दंडाचें भय। ते सदा सर्वदा निर्भय। लावोनियां हरिचरणीं लय। सदैव दुर्जय कळिकाळा ।। बाबा अत्यंत परोपकारी। काय वर्णावी तयांची थोरी। दिसाया उग्र बाह्यात्कारीं। परी अंतरीं अति सौम्य ।। अगाध तयांचें महिमान। वाणी होऊनि निरभिमान। करील तच्चरणाभिवंदन। तरीच अवगाहन करील ।। व्यापूनियां स्थिर चर। उरीं उरला विश्वंभर। विचारूनि हें निरंतर। करीना वैर कुणासीं ।।९२ ।। तोच भरलासे सर्व सृष्टीं। दाही दिशां पाठीं पोटीं। कोणावरीही वक्र दृष्टी। करितां तो कष्टी होतसे ।। अंगीं जरी वैराग्य पूर्ण। स्वयें लोकसंग्रहार्थ आपण। करी प्रापंचिकाचें आचरण। द्यावया शिकवण आश्रितां ।। काय या महात्म्याची लीनता। ऐकतां वाटेल आश्चर्य चित्ता। दिसून येईल भक्तप्रेमळता। अवतारसार्थकता तयांची ।। अतुल दीनवत्सलता पोटीं। सानपणाची आवड मोठी। प्रत्यंतरास कोट्यनुकोटी। येतील गोष्टी सांगावया ।। कधीं ना उपास वा तापास। हठयोगाचाही सायास। कधीं न रसासक्तीची आस। अल्पाहारास सेवीतसे ।। जाऊनियां नियमित घरीं। मागे ओली कोरडी भाकरी। हीच भिक्षा नित्य मधुकरी। कोड न करी जिव्हेचें ।। पुरवी न रसनेचे लाड। मिष्टान्नाची धरी न होड। प्राप्ताप्राप्त धडगोड। त्यांतचि गोड मानी तो ।। ऐसेपरी प्राणधारण। करून करी शरीररक्षण। कीं तें ज्ञान मोक्षसाधन। निरभिमान सर्वदा ।। निजशांती जयाचें भूषण। कासया त्या माळामंडण। नलगे चंदनविभूतिचर्चन। ब्रह्म पूर्ण श्रीसाई ।। जया न कोणी मालक वाली। तया सांभाळी साई माउली। सडलीं पडलीं आणि कावलीं। तीं विसावलीं मशिदींत ।। थट्टाविनोदीं सकळां प्रीति। बाबांची तों अलौकिक रीति। थट्टेंतूनही सारचि ठसविती। हितकारक ती सकळांना ।। शिक्षणाच्या विलक्षण पद्धती। अनेकांच्या अनेक असती। बाबा जयांची जैसी गती। शिक्षण देती त्यां तैसें ।। बाबा बालब्रह्मचारी। ऊर्ध्व रेते शुद्धाचारी। करूं देत सेवा चाकरी। नरनारी समस्तां ।। समर्थ स्वयें सामर्थ्यवंत। निग्रहानुग्रहज्ञानवंत। गुणावगुण सेवकजनांत। आपण किमर्थ पाहावे ।। एकाची सेवा साईंस सुखकर। दुजयाची ती असती प्रखर। हे तरी निजबुद्धीचे विकार। खरा प्रकार आकळेना ।। भक्तीं करावे मनोरथ। ते न जाणती खरा स्वार्थ। गुरु एक जाणे शिष्याचें हित। भावी-भूत-वर्तमान ।। निजमनींचें मनोगत। कोणी कितीही ठेवो गुप्त। साई समर्थ सर्वगत। अंतर्वृत्त जाणे तो ।। जेव्हां कोणी मनींचें हृद्गत। साईचरणीं प्रेमें निवेदित। पूर्ण विश्वासें अनुज्ञा प्रार्थित। दावित सत्पथ साई त्यां ।। हें तों तयांचें निजव्रत। जाणती हें भक्त समस्त। जो जो अनन्य शरणागत। आपदा वारीत तयांच्या ।। गुरूचि सत्य माता-पिता। अनेका जन्मींचा पाता-त्राता। तोचि हरिहर आणि विधाता। कर्ता-करविता तो एक ।। जीवमात्राचें मनोगत। बाबांस सकळ अवगत। वर्तमान-भविष्य-भूत। जैसा करतलग - आमलक ।। निजभक्ताची भावी स्थिती। समस्त ठावी बाबांप्रती। कैसे वेळेवर सावध करिती। ती स्पष्टोक्ती परिसावी ।। असो ही तों बाबांची वैखरी। बाबा असतां देहधारी। परी पुढेंही देहत्यागानंतरीं। स्वयें निर्धारी निजमहिमा ।। ''झालों जरी गतप्राण। वाक्य माझें माना





प्रमाण। माझीं हाडें तुर्वतीमधून। देतील आश्वासन तुम्हांस ॥ मी काय पण माझी तुर्बत। राहील तुम्हांसवें बोलत। जो तीस अनन्य शरणागत। राहील डोलत तयासवें ॥ डोळ्याआड होईन ही चिंता। करूं नका तुम्ही मजकरितां। माझीं हाडें ऐकाल बोलतां। हितगुज करितां तुम्हांसवें ॥ मात्र माझें करा स्मरण। विश्वासयुक्त अंतःकरण। ठेवा करा निष्कामभजन। कृतकल्याण पावाल'' ॥ दैव शिरडीचें, म्हणूनि झालें। बाबा तेथें आगमन आपुलें। पुढें तेथेंच वास्तव्य केलें। क्षेत्रत्व आणिलें त्या स्थाना ॥ धन्य शिरडीचें सुकृत। कीं हा साई कृपावंत। करी या स्थळा भाग्यवंत। अलंकृत निजवास्तव्यें ॥ रोग घालविती केवळ दर्शनें। अथवा केवळ हस्तस्पर्शनें। अथवा शुद्ध कृपावलोकनें। आले अनेकां अनुभव ॥ होतां अनन्यशरणागत। कृतकल्याण पावत भक्त। जाणूनि सकळांचें मनोगत। पुरवीत मनोरथ सर्वांचे ॥ उदीधारणें पिशाचें पळतीं। आशीर्वचनें पीडा टळतीं। कृपानिरीक्षणें बाधा चुकतीं। लोक येती धांवोनीं ॥ जे जे भक्त शरणागत। साधावया तत्कार्यार्थ। साई तयांस दावी यथार्थ। सन्मार्ग हितार्थ तयांच्या ॥ तरी श्रोतां एकाग्रमन। होऊनि करा सच्चरितावर्तन। तें हें परम गुरुकृपासाधन। चरित्र पावन साईंचें ॥ नवल बाबांची अद्‌भुत कृती। जेव्हां कोणा प्रसन्न होती। तया मग ते अनुग्रह देती। कवण्या स्थितीं तें परिसा ॥ आलें एकदां तयांचे चित्तां। ध्यानीं मनीं कोणाच्या नसतां। सहज थट्टा विनोद करितां। भक्तकृतार्थता साधीत ॥ शब्दब्रह्माचें कितीही तेज। शुद्धब्रह्मापुढें निस्तेज। साई परब्रह्ममूर्ती सतेज। विद्वत्ते लाज लावी ती ॥ ऐसा कृपाळू श्रीसमर्थ। प्रणतपाळ साईनाथ। पुरवी नित्य भक्तमनोरथ। साधी निजहित तयांचें ॥ साई नव्हे एकदेशी। साई सर्वभूतनिवासी। आब्रह्मकीटक-मुंगीमाशी। व्यापक सर्वांशीं सर्वत्र ॥ साई शब्दब्रह्मी पूर्ण। दावी परब्रह्मींची खूण। ऐसा उभयभागीं प्रवीण। तेणेंच सद्‌गुरुपण तयातें ॥ स्वयें मोठा ज्ञानी गहन। करूं नेणे शिष्यप्रबोधन। अथवा निजस्वरूपावस्थान। त्याचें सद्‌गुरुपण तयाला ॥ पिता देई देहासीं जनन। जननापाठीं लागे मरण। गुरु निर्दाळी जनन-मरण। तें कनवाळुपण आणीक ॥ ''माझा माणूस देशावर। असो कां हजारों कोस दूर। आणीन जैसें चिडीचें पोर। बांधून दोर पायांस'' ॥ ऐसें बाबा कितीदां वदले। जनां लोकांहीं बहुतीं ऐकिलें। अनुभवाही तैसेंच आलें। कितीक त्या लीला बाबांच्या ॥ काढोनि ऋण करणें सण। अथवा यात्रापर्यटण। नावडे बाबांस कर्जबाजारीपण। शिकवण ही मुख्य येथील ॥ हेंच साईभक्तीचें वर्म। व्हावा मात्र सुदैवें समागम। मग तया कांहीं न दुर्गम। सर्वचि सुगम क्रमेंक्रमें ॥ बसतां उठतां वार्ता करितां। सकाळा दुपारा फेरिया फिरतां। भक्त श्रद्धा स्थैर्य धरितां। ईप्सितार्था संपादी ॥ परी ऐसी कांहीं खूण। प्रत्यक्ष व्यवहारीं पटवून। क्रमानुसार गोडी लावून। परमार्थाकलन तो करवी ॥ साईबाबा महासंत। धीर उदार आणि दान्त। यात्रेकरूंसी कृपावंत। पैसे अत्यंत वांटिती ॥ दिडक्या चवल्या हाताचा कीस। अधेल्या-पावल्यांचा पाऊस। रुपये दहा कोणास वीस। कोणास पन्नास ते देत ॥ हें काय सणासुदा दिसीं। कार्यविशेषीं कां पर्वकाळासी। प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं। संतोषेंसीं अर्पीत ॥ पहूड येती भवय्ये नाचती। गवय्ये गाती भाट वानिती। तमासगीर मुजरे देती। भजनीं रंगती हरिभक्त ॥ कधीं आलिया बाबांचे चित्तीं। पांथस्थांतेंही पैसे वांटिती। दीनादुबळ्यांचा परामर्ष घेती। कृपामूर्ती साईनाथ ॥ पैसे वांटीत हें तों सत्य। नव्हतें यांत कांहींही असत्य। परी ते नव्हते सर्वांस देत। ठावें न मनोगत कवणातें ॥ फकीर फुकटे भिक्षेकरी। सदैव येत बाबांचे द्वारीं। बाबा जरी दयाळू भारी। धर्म न करीत सर्वांतें ॥ जयाची लाभकाळाची घडी। तयासीच ही सुखपरवडी। संतहस्तस्पर्शाची कवडी। लाभेल जोडी भाग्याची ॥ साईंचिया आशीर्वचनीं। साईंची आठवण ध्यानीं मनीं। मार्ग चालतां दिवसरजनीं। दुःख ना स्वप्नीं तिळभरी ॥ दळावयाच्या जात्याचा खुंट। हालहालवूनि बसविती घट्ट। तैसीच गुरुपदनिष्ठेची गोष्ट। हालवूनि चोखट साई करी ॥ ऐसें न कोणा केव्हांही कथिती। जेणें न हालेल चित्तवृत्ती। हे तों बाबांची नित्य प्रचीति। निष्ठा ये रीतिं दृढ करिती ॥ देऊनियां संकटां तोंड। करितां साईस्मरण अखंड। होती सकळ अपाय दुखंड। शक्ती ही प्रचंड नामाची ॥ हेंच या अंतरायांचें प्रयोजन। तेंही करी साईच निर्माण। तेव्हांच घडेल साईस्मरण। संकटोपशमनही तेव्हांच ॥ मनाच्या वृत्ती कोट्यनुकोटी। त्यागून ओखटी धरावी गोमटी। मग पहा साईची कैंची हतवटी। उभाच पाठीं भक्तांच्या ॥ वृत्ती असावी मात्र गोड। नवल साई पुरवितो होड। जया सद्‌वृत्तीची आवड। तयाचें कोडं त्या हातीं ॥ एकाचा रुपया परत देती। एकाचा तो खिशांत सुदती। कारण काय वदावें निश्चितीं। काय चित्तीं बाबांच्या ॥ जयावरी ते कृपा करिती। अचिंत्य महाशक्ती पावती। आत्मानात्मविवेकसंपत्ती। सर्वेचि प्राप्ती ज्ञानाची। निजभक्तांचा मनोरथ। जाणे संपूर्ण साईनाथ।

पुरविताही तोच समर्थ। तेणेंचि कृतार्थ तद्भक्त।। धांव पाव गा साईनाथा। ठेवितों तुझिया चरणीं माथा। विसरोनियां अपराधां समस्तां। निवारीं चिंता दासाची।। ऐसा संकटीं गांजितां। भक्त स्मरे जो साईनाथा। तयाचिया उद्विग्न चित्ता। शांतिदाता तो एक।। हा साईलीलाकल्पतरु। निर्विकल्प फलपुष्पधरु। असेल भक्त भाग्याचा सधरु। तोचि उतारू ये तळीं।। आपुल्या भक्तांचे पुरवावे हेत। आणावें तयांस दर्शनार्थ। पुरवावे स्वार्थ वा परमार्थ। हेचि मनोरथ बाबांचे।। नातरी ते अवाप्तकाम। स्वयें सर्वदा निष्काम। निःस्वार्थ निरहंकार निर्मम। भक्तकामैक-अवतार।। क्रोध ज्याचा घेई न वारा। द्वेषास जेथें न लभे थारा। डोळां न देखे जो उदरंभरा। साधु खरा तो समजावा।। सर्वांठायीं प्रेम निःस्वार्थ। हाच ज्याचा परमपुरुषार्थ। वेंची न धर्मविषयाव्यतिरिक्त। वाचा हा व्यर्थ पळभरी।। कोणी बाबांचे पाय धूती। पळींत अंगुष्ठतीर्थ घेती। शुद्ध सद्भावें सेवन करिती। नेत्र स्पर्शिती तैं कोणी।। कोणी लाविती तयांस गंध। कोणी फांसिती अत्तर सुगंध। ब्राह्मण-शूद्रादि जातिनिर्बंध। गेले संबंध विसरूनि।। साईसमर्थ ब्रह्म सनातन। ब्रह्मलिखित तयांचें वचन। पाहील जो विश्वास ठेवून। घेईल पूर्ण अनुभव तो।। स्वयें आपण असतां अवतारी। वंद्य मानूनियां वणजारी। अन्नब्रह्म निजनिर्धारीं। सेवूनि थोरी गाइली।। तैसेंच तया जो अवमानी। तयाची कैसी होते हानी। गाइली ही प्रबुद्धांची कहाणी। कोणी न ज्ञानी गुरूविण।। या शिरडीसंताचिया दरबारा। जोशीही येती देती मुजरा। सांगती नरदेहाचा होरा। भविष्य थोरां-मोठ्यांस।। धन-धान्य-वैभवयोगी। राजे रजवाडे आणि जोगी। तडी तापडी रागी विरागी। दर्शनालागीं उत्कंठित।। जपी तपी व्रती संन्यासी। यात्रेकरू क्षेत्रनिवासी। गायक नर्तक परिवारेंसीं। येत शिरडीसी दर्शना।। महारही येई जोहारा। या साईचिया दरबारा। म्हणे हाचि एक मायबाप खरा। चुकवील येरझारा जन्माच्या।। आत्मलिंग जयाचे गळां। विभूति फांसिली जयाचे भाळां। जयाचा कोरान्न भिक्षेवर डोळा। पहावा सोहळा जंगमाचा।। मानभाव गारोडी येती। गोंधळी प्रेमें गोंधळ घालिती। भवानीचा जोगवा मागती। अति प्रीति बाबांसी।। अंध पंगू कानफाटे। जोगी नानक भाट दिवटे। समर्थ साईंच्या भक्तिपेठे। धांवती मोठे प्रेमानें।। धन्य धन्य साईंची आकृती। वैराग्याची ओतीव मूर्ती। निर्विषय निःसंग निःस्वार्थी। भक्तभावार्थी अनुपम्य।। बाबा न स्वयें उपाशी राहत। कोणासही न राहूं देत। उपोषिताचें न स्वस्थ चित्त। कैंचा परमार्थ तयाचा।। भुकेल्या पोटीं देव सांपडे। हें तों कल्पांतींही न घडे। उपासतापास यांचें सांकडें। चालेना इकडे साईंसी।। कोणाचें काय अंतर्गत। साईनाथ जाणे समस्त। ऐसें न कांहीं भूमंडळांत। नसे जें अवगत तयांस।। मागमागोनि दक्षिणा घेत। दीनां दुबळ्यांस धर्म करीत। उरल्याच्या मोळ्या खरीदीत। ढीग रिचवीत काष्ठांचे।। तयां शुष्क काष्ठांप्रत। सन्मुख धुनीमाजीं होमीत। तयांची राख होई जी अमित। उदी ती ओपीत भक्तांस।। शिरडीहूनि गांवीं परततां। बाबांपाशीं रजा मागतां। उदी देण्याचा परिपाठ होता। ठावें हें समस्तां भक्तांस।। किंबहुना आणा उदी म्हणतां। खरी अनुज्ञा झाली आतां। म्हणोन ज्याचे त्याचे चित्ता। परताया उल्हासता वाटतसे।। तैसेंच शिरडींत वास्तव्य असतां। माध्यान्हीं आणि सायंप्रातः। बाबा कोणासही उदी न देतां। रिक्तहस्ता पाठवीत।। हाच प्रत्यहीं होता क्रम। परि त्या उदीचा काय धर्म। मशिदींत धुनी कां अविश्रम। कां हा उपक्रम नित्याचा।। विभूतिदानीं मनोगत। बाबा काय सुचवीत। हें दृश्य सकळ विश्वांतर्गत। राख हें निश्चित मनीं उमजा।। देहही

